सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२४ – २०२५

## वित्त विभाग

(संचालनालय, लेखा व कोषागारे)

(प्रकाशन क्रमांक २)

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

२०२४

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२४ – २०२५

## वित्त विभाग

(संचालनालय, लेखा व कोषागारे)

(प्रकाशन क्रमांक २)

# वित्त विभागाने तयार केलेल्या कार्यक्रम अंदाजपत्रकाची यादी

| कार्यक्रम अंदाजपत्रकाचा क्रमांक | कार्यक्रम अंदाजपत्रकाचे नाव |
|---|---|
| १ | वित्त विभाग, मंत्रालय. |
| २ | संचालनालय, लेखा व कोषागारे. |
| ३ | विक्रीकर. |
| ४ | अल्पबचत व लॉटरी. |
| ५ | विमा. |
| ६ | स्थानिक निधी लेखा परीक्षा. |

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | संचालनालय, लेखा व कोषागारे - आस्थापना व अर्थसंकल्प विषयक माहिती | १ |
| २ | संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे संगणकीय प्रणाली व अनुषंगिक माहिती | १० |
| ३ | व्हर्च्युअल ट्रेझरी, शासकीय जमा लेखांकन पद्धती | १९ |
| ४ | राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांच्या मासिक निवृत्तीवेतनाचे प्रदान | २४ |
| ५ | राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना,<br>राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय, मुंबई | २७ |
| ६ | राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना, १९८२ | ३४ |
| ७ | वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना | ३७ |
| ८ | संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे प्रशिक्षण व परीक्षा विषयक कार्यक्रम | ३९ |
| ९ | संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे अन्य कामकाज | ४७ |
| १० | वेतन पडताळणी पथक | ५० |
| ११ | अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई  यांची माहिती. | ५२ |
| १२ | कोषागार कार्यालयांची माहिती. | ५८ |

# प्रकरण क्रमांक १

# संचालनालय, लेखा व कोषागारे - आस्थापना व अर्थसंकल्प विषयक माहिती

## प्रस्तावना

लेखा व कोषागारे संचालनालयाची स्थापना दिनांक १ जानेवारी,१९६२ रोजी करण्यात आली. या संचालनालयाच्या स्थापनेमुळे पूर्वी वित्त विभागाच्या थेट नियंत्रणाखाली असलेली कोषागारे, स्थानिक निधी लेखापरीक्षा, लेखा अधिकारी (प्रशिक्षण), भांडार पडताळणी व दक्षता पथके यांच्याकडील लेखाविषयक कामे संचालनालयाच्या नियंत्रणाखाली आणण्यात आली. निरनिराळया शासकीय विभागांमधील लेखाविषयक कामांशी संबंधित अशी राजपत्रित तसेच अराजपत्रित पदे एकत्र आणता येतील असे शासनाचे एकरूप लेखा सेवा स्थापन करण्याचे या मागील उद्दिष्ट होते. कारण निरनिराळया विभागांमधील लेखाविषयक कामे करणाऱ्या पर्यवेक्षी कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी, कामाचे स्वरूप व अर्हता याबाबतीत एकरूपता नव्हती. शिवाय, अशा एकरुप लेखा सेवेच्या अभावी निरनिराळया शासकीय विभागातील लेखाविषयक व वित्तीय कामे करणाऱ्या पदधारकांना पुढील बढतीची संधी मिळत नव्हती. तसेच अर्हताप्राप्त लेखा अधिकाऱ्यांची उणीव असल्यामुळे वेगवेगळ्या शासकीय विभागांना आपले लेखाविषयक काम योग्य प्रकारे करणे अतिशय कठीण होते.

यासाठी शासनाने १ फेब्रुवारी, १९६५ पासून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेची स्थापना केली. यामध्ये निरनिराळया शासकीय विभागांमधील लेखाविषयक कामे करणा-या सर्व राजपत्रित व अराजपत्रित पर्यवेक्षी पदांचा समावेश करण्यात आला. यामुळे केवळ निरनिराळया शासकीय विभागांमध्येच नव्हे तर महामंडळ, प्रकल्प, विद्यापीठे, मंडळे, जिल्हा परिषदा, वाणिज्यिक विभाग, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय इत्यादींमध्ये देखील लेखाविषयक व वित्तीय जबाबदारीची कामे करण्यासाठी पुरेशी अर्हता व अनुभव असलेले प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होऊ शकतात. तसेच यामुळे कर्मचा-यांना सर्वांगीण अनुभव मिळण्याच्या दृष्टीने त्यांची अदलाबदल करण्याची सोय उपलब्ध होते. १ फेब्रुवारी, १९६५ रोजी या सेवेमध्ये एकूण ३७५ अधिकारी होते. माहे नोव्हेंबर, २०२३ अखेर संचालनालयाच्या अधिनस्त मंजूर राजपत्रित अधिकाऱ्यांची संख्या एकूण ३०७० इतकी आहे.

संचालक, लेखा व कोषागारे हे विभागप्रमुख आहेत. संचालनालयाचे मुख्यालय मुंबई येथे असून पुढील कार्यालये, लेखा व कोषागारे संचालनालयाच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली आहेत.

१) कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपुर येथील विभागीय सह संचालक कार्यालये.
२) राज्यातील सर्व जिल्हा कोषागारे व उपकोषागारे.
३) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
४) व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई.
५) राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई.
६) मुंबई/पुणे/नागपुर/औरंगाबाद/अमरावती/नाशिक येथील लेखा प्रशिक्षण केंद्रे.
७) वेतन पडताळणी पथके.
८) भांडार पडताळणी पथके.

संचालक, लेखा व कोषागारे हे विभागप्रमुख असून त्यांचे मुख्यालय मुंबई येथे आहे. मुख्यालयात सहसंचालक, उपसंचालक व सहाय्यक संचालक व पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती व कोकण येथील सहा प्रादेशिक सहसंचालक यांचे संचालकांना त्यांचे कामात सहाय्य होते. कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथील विभागीय सहसंचालक हे आपापल्या विभागातील कोषागारे व उपकोषागार कार्यालयांच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवतात. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई हे सहसंचालक दर्जाचे अधिकारी असून चर्चगेट व वांद्रे या अधिदान व लेखा कार्यालयाच्या शाखांमध्ये चालणाऱ्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवतात. हे सर्व अधिकारी संचालकांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आपली कामे पार पाडतात.

विभागप्रमुख या नात्याने संचालक हे आपल्या प्रशासकीय नियंत्रणाधीन कार्यालयांचे व्यवस्थापन, पर्यवेक्षण व कार्यक्षम कामकाज यासाठी जबाबदार असतात. त्याखेरीज कोषागार विषयक कामकाज, महाराष्ट्र कोषागार नियम, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यासाठी सेवाप्रवेश नियम, लेखाविषयक विभागीय परीक्षांसाठीचे नियम, पाठ्यक्रम यात होणाऱ्या सुधारणा लागु करणे, कर्मचाऱ्यांचे लेखा विषयक प्रशिक्षण, ३४ कोषागारे व ३२३ उपकोषागारे यांची प्रशासकीय तपासणी तसेच विविध शासकीय विभाग व कार्यालये यांना लेखा व वित्त विषयक बाबींच्या संबंधात सल्ला देणे यांसारखी कामेसुध्दा संचालकांना पार पाडावी लागतात. भांडार पडताळणी शाखा तसेच वेतन पडताळणी शाखासुध्दा त्यांच्या नियंत्रणाखाली काम करते.

तक्ता क्रमांक १

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील मंजूर पदे.

| अ.क्र. | संवर्ग | संचालनालय व अधिनस्त कार्यालये | स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय | जिल्हा परिषद | अन्य विभाग / कार्यालये व इतर संस्था | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संचालक | १ | १ | ० | २७ | २९ |
| २ | सह संचालक | ११ | ८ | ० | ४१ | ६० |
| ३ | उप संचालक | १४ | ४ | ३४ | ८६ | १३८ |
| ४ | सहाय्यक संचालक | ६९ | ५७ | ३४ | १६६ | ३२६ |
| ५ | लेखा अधिकारी | १६६ | ६७ | ६८ | ७८२ | १०८३ |
| ६ | सहा. लेखा अधिकारी (माहे नोव्हेंबर,२०२३ अखेर) | ३९२ | १६५ | ० | ८७७ | १४३४ |
| **एकूण** | | **६५३** | **३०२** | **१३६** | **१९७९** | **३०७०** |

गट “क” व गट “ड” मधील मंजूर पदे :

संचालनालय, लेखा व कोषागारे, विभागीय सह संचालक, लेखा व कोषागारे, अधिदान व लेखा कार्यालय, राष्ट्रीय निवृत्तीवेतनासाठी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय, व्हर्च्युअल ट्रेझरी, राज्यातील सर्व कोषागारे व उपकोषागारे येथीलगट क पदांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक २

संचालनालय लेखा व कोषागारे व अधिनस्त कार्यालयांतील गट क मधील मंजूर पदे.

| अ.क्र. | पदनाम | संचालनालय व अधिनस्त कार्यालये |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ लेखापाल | ४०७ |
| २ | सहायक अधीक्षक | १०७ |
| ३ | कनिष्ठ लेखापाल | १३०१ |
| ४ | लेखा लिपिक | १३८८ |
| ५ | लघुटंकलेखक | ४ |
| ६ | दुरध्वनी चालक | २ |
| ७ | वाहन चालक | २९ |
| एकूण | | ३२३८ |

तसेच गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची एकूण मंजूर पदांची संख्या ५७६ इतकी आहे.

# तक्ता क्रमांक ३

## संचालनालय लेखा व कोषागारे आणि अधिनस्तकार्यालयांतील महिला कर्मचाऱ्यांचा तपशील.

सन १९९४ मध्ये महिला धोरण तयार करण्यात आले, असे धोरण करणारे महाराष्ट्र हे आपल्या भारत देशातील पहिले राज्य आहे.


संचालनालय, लेखा व कोषागारे मधील महिला धोरण २००१ अनुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा तक्ता

| अ.क्र. | संवर्ग | वर्ष | एकूण कर्मचारी (वर्ष अखेर) | पुरुष कर्मचाऱ्यांची संख्या (वर्ष अखेर) | महिला कर्मचारी | | | अल्पवयीन मुलींशी विवाह केलेल्या प्रकरणांची संख्या | हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार उद्भवलेल्या प्रकरणांची संख्या | महिलांच्या लैंगिक छळाबाबत केलेली कार्यवाही /संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नेमणूका (वर्षभरात) | पदोन्नत्या (वर्षभरात) | एकूण संख्या (४-५) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | गट अ | २०२२-२०२३ | ३८७ | २८३ | १ | १२ | १०४ | ० | ० | ० |
| | | २०२३-२०२४ | ३९९ | २८८ | ० | २३ | १११ | ० | ० | ० |
| २ | गट ब (राप-लेखाधिकारी) | २०२२-२०२३ | ९०३ | ६५४ | ० | ९० | २४९ | ० | ० | ० |
| | | २०२३-२०२४ | ८५७ | ६२९ | ० | १६ | २२८ | ० | ० | ० |
| ३ | गट ब (राप-सलेअ) | २०२२-२०२३ | ११८४ | ८४४ | ४० | ० | ३४० | ० | ० | ० |
| | | २०२३-२०२४ | ९५५ | ६३५ | ० | ४२ | ३२० | ० | ० | ० |
| ४ | गट क | २०२२-२०२३ | २३२८ | १५८६ | ६२ | ५४ | ७४२ | ० | ० | ० |
| | | २०२३-२०२४ | २१९७ | १४७० | ६५ | ४९ | ७२७ | ० | ० | ० |
| ५ | गट ड | २०२२-२०२३ | ३४६ | २७० | ५ | ४ | ७६ | ० | ० | ० |
| | | २०२३-२०२४ | ३३६ | २६२ | ४ | १ | ७४ | ० | ० | ० |
| **एकूण** | | **२०२२-२०२३** | ५१४८ | ३६३७ | १०८ | १६० | १५११ | **०** | **०** | **०** |
| | | **२०२३-२०२४** | ४७४४ | ३२८४ | ६९ | १३१ | १४६० | **०** | **०** | **०** |

टिप : उपरोक्त तक्त्यात दर्शविलेली आकडेवारी ही संचालनालयाच्या अधिनस्त असलेली सर्व विभागीय कार्यालये, अधिदान व लेखा कार्यालय, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय तसेच संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या शाखांकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार दर्शविण्यात आली आहे.सन २०२३-२०२४ ची माहे नोव्हेंबर २०२३ अखेर पर्यंतची माहिती दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्रमांक ४

# - संचालनालय, लेखा व कोषागारे कार्यालयातील रचनात्मक तक्ता -



तक्ता क्रमांक ५

# विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील रचनात्मक तक्ता

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग | सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग | सहसंचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद विभाग | सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग | अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई | राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय, मुंबई | व्हर्चुअल ट्रेझरी, मुंबई आभासी कोषागार कार्यालय, मुंबई |
| | | | | | | | (स्वतंत्र कार्यालय) | (स्वतंत्र कार्यालय) |
| ५ कोषागार कार्यालये | ५ कोषागार कार्यालये | ५ कोषागार कार्यालये | ८ कोषागार कार्यालये | ५ कोषागार कार्यालये | ६ कोषागार कार्यालये | वांद्रे व चर्चगेट येथे प्रत्येकी १ या प्रमाणे २ कार्यालये | | |
| ४५ उपकोषागार कार्यालये | ५३ उपकोषागार कार्यालये | ४९ उपकोषागार कार्यालये | ६९ उपकोषागार कार्यालये | ५० उपकोषागार कार्यालये | ५८ उपकोषागार कार्यालये | | | |

# तक्ता क्रमांक ६

## तीन वर्षांची अर्थसंकल्पीय तरतुद दर्शविणारा तक्ता

(रुपये लाखांत)

| अ. क्र. | कार्यक्रम | | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | | | अर्थसंकल्प २०२३-२०२४ | | | सुधारित अंदाज २०२३-२०२४ | | | अर्थसंकल्प २०२४-२०२५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनिवार्य | कार्यक्रम | एकूण | अनिवार्य | कार्यक्रम | एकूण | अनिवार्य | कार्यक्रम | एकूण | अनिवार्य | कार्यक्रम | एकूण |
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | मागणी क्र. जी-५, २०५४ कोषागारे व लेखा व प्रशासन | भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | २.०० | ०.०० | २.०० | १.४० | ० | १.४० | २.०० | ० | २.०० |
| | | दत्तमत | ३५२७७.३१ | ०.०० | ३५२७७.३१ | ३७८८७.०६ | ०.०० | ३७८८७.०६ | ४९९.४९ | ० | ४९९.४९ | ५६१.१० | ० | ५६१.१० |
| | **एकूण** | **भारित** | **०.००** | **०.००** | **०.००** | **२.००** | **०.००** | **२.००** | **१.४०** | **०** | **१.४०** | **२.००** | **०** | **२.००** |
| | | **दत्तमत** | **३५२७७.३१** | **०.००** | **३५२७७.३१** | **३७८८७.०६** | **०.००** | **३७८८७.०६** | **४९९.४९** | **०** | **४९९.४९** | **५६१.१०** | **०** | **५६१.१०** |

# तक्ता क्रमांक ७

## एकूण अर्थसंकल्पीय तरतुदींचा गोषवारा.

(रुपये लाखांत)

| अ.क्र | कार्यक्रम | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | अर्थसंकल्प २०२३-२०२४ | सुधारित अंदाज २०२३-२०२४ | अर्थसंकल्प २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| प्रधानशीर्ष २०५४ कोषागारे व लेखा प्रशासन | | | | | |
| १ | ०९५, लेखा व कोषागारे संचालनालय | | | | |
| | भारित | ०.०० | २.०० | १.४० | २.०० |
| | दत्तमत | ५७७१.५२ | ६६४१.९३ | ६५०१.४३ | ८३५६.३२ |
| | | | | | |
| २ | ०९६ अधिदान व लेखा कार्यालये (अनिवार्य) | ४२९८.०४ | ४७७६.१७ | ४१४१.८२ | ४७९५.०७ |
| | | | | | |
| ३ | ०९७ कोषागार आस्थापना (अनिवार्य) | २४२३४.७३ | २५२५२.२९ | २६१४८.२१ | २८१००.३५ |
| | | | | | |
| ४ | ००३ प्रशिक्षण (अनिवार्य) | २८५.७२ | ३५०.५३ | ३४१.१६ | ४११.९९ |
| | | | | | |
| ५ | ०९९ नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना यंत्रणा (अनिवार्य) | ६८७.३० | ८६६.१४ | ८६५.३२ | ८९१.८९ |
| | | | | | |
| | **एकूण भारित** | ०.०० | २.०० | १.४० | २.०० |
| | **एकूण दत्तमत** | **३५२७७.३१** | **३७८८७.०६** | ४९९.४९ | ५६१.१० |

## तक्ता क्रमांक ८

## संचालनालय, लेखा व कोषागारे करीता अर्थसंकल्पीय तरतुद

(रुपये लाखांत)

| अ.क्र | कार्यक्रम | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | अर्थसंकल्प २०२३-२०२४ | सुधारित अंदाज २०२३-२०२४ | अर्थसंकल्प २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **(अ) कार्यांचे वर्गीकरण.** | | | | |
| | **०९५ लेखा व कोषागारे संचालनालय** | | | | |
| | ०९५ (००) (०१) लेखा व कोषागारे संचालनालय (अनिवार्य) | | | | |
| | भारित | ०.०० | २.०० | १.४० | २.०० |
| | दत्तमत | २७४३.४७ | ३१६८.६९ | ३१४९.६४ | ४२२४.१६ |
| | ०९५ (००) (०२) भांडार पडताळणी व दक्षता पथक (अनिवार्य) | ८८०.६९ | १०४०.९६ | १००३.३५ | १२२४.०३ |
| | ०९५ (००) (०३) जि.प.मु.ले व वि.अ. तसेच ले.अ. यांचे वेतन व भत्ते (अनिवार्य) | १८२०.३५ | २०४१.९४ | १९७७.८३ | २४७४.५५ |
| | ०९५ (००) (०५) संगणकीकरणावरील खर्च (अनिवार्य) | ३२७.०१ | ३९०.३४ | ३७०.६१ | ४३३.५८ |
| | **एकूण भारित** | **०.००** | **२.००** | **१.४०** | **२.००** |
| | **एकूण दत्तमत** | **५७७१.५२** | **६६४१.९३** | **६५०१.४३** | **८३५६.३२** |
| | **(ब) उद्दिष्ट निहाय वर्गीकरण** | | | | |
| | वेतन | ५६५९.२३ | ६४६१.९९ | ६३५७.७८ | ८१६२.६९ |
| | मजुरी | ०.३७ | ०.४२ | ०.३८ | ०.४४ |
| | अतिकालिक भत्ता | २.१० | ४.२ | ३.३६ | ४.४१ |
| | दुरध्वनी, वीज व पाणी | २९.४७ | ३१.१६ | ३०.८२ | ४१.५५ |
| | कंत्राटी सेवा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | देशांतर्गत प्रवास खर्च | २०.८३ | ६९.०४ | ४४.४० | ६२.८१ |
| | कार्यालयीन खर्च | ५०.४२ | ६४.५० | ५५.०५ | ६७.७३ |
| | भाडेपट्टी व कर | ३.१७ | २.४० | २.४० | ३.२२ |
| | संगणक खर्च | ०.०० | ०.०३ | ०.०३ | ०.४६ |
| | पेट्रोल, तेल व वंगण | ४.१४ | ६.५९ | ५.९३ | १०.०१ |
| | व्यावसायिक सेवा | १.७९ | १.६० | १.२८ | ३.०० |
| | **एकूण भारित** | ०.०० | २.०० | १.४० | २.०० |
| | **एकूण दत्तमत** | ५७७१.५२ | ६६४१.९३ | ६५०१.४३ | ८३५६.३२ |
| | **(क) वित्त व्यवस्थेची साधने** | | | | |
| | **भारित** | **०.००** | **२.००** | **१.४०** | **२.००** |
| | **दत्तमत** | **५७७१.५२** | **६६४१.९३** | **६५०१.४३** | **८३५६.३२** |

# प्रकरण क्रमांक २

# संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे संगणकीय प्रणाली व अनुषंगिक माहिती.

राज्यातील कोषागार व उपकोषागारांचे मोठया प्रमाणावर संगणकीकरण करण्यात आले आहे. विविध संगणकीय आज्ञावलींचा उपयोग लेखे तयार करण्यासाठी व जतन करण्यासाठी तसेच वेतन व निवृत्तीवेतन प्रदान करण्यासाठी होतो. महत्वाच्या आज्ञावली पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | आज्ञावलीचे नाव | तपशील |
|---|---|---|
| १ | कोषवाहिनी | लेखाशीर्षवार जमा व खर्चाचे मासिक लेखे अहवाल. |
| २ | ट्रेझरीनेट | कोषागारांत संगणकीय पद्धतीने देयके पारित करणे व लेखे तयार करण्यासाठीची प्रणाली. |
| ३ | बीम्स | अर्थसंकल्पीय अंदाज, मंजुर अनुदानाचे वितरण आणि करण्यात आलेला खर्च प्राधिकृत करण्यासाठी. |
| ४ | ग्रास | इ-पेमेंट गेटवेद्वारे शासकीय महसुल जमा करणे. |
| ५ | अर्थवाहिनी | कोषागारातील जमा व खर्चाचे लेखे, मास्टर डाटा व ट्रेझरीनेट प्रणालीचे व्यवस्थापन व नियंत्रण करण्यासाठीची माहिती पेढी. |
| ६ | सेवार्थ | कर्मचाऱ्यांची आवश्यक माहिती नोंदवुन वेतन देयके तयार करणे आणि कर्मचाऱ्याच्या खात्यात वेतन थेट जमा करण्याकरीता. |
| ७. | निवृत्तीवेतनवाहिनी | निवृत्तीवेतनधारकांच्या बँक खात्यात निवृत्तीवेतनाची रक्कम थेट आणि विहित वेळेत जमा करण्याकरीता. |
| ८ | राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना आज्ञावली | राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेखालील कर्मचाऱ्यांचे लेखांकन, वार्षिक लेखा ठेवणे, परतावे, वार्षिक लेखाचिठ्ठी तयार करण्याकरीता. |
| ९ | कर्ज व अग्रिमे | शासकीय कर्मचा-यांना कर्ज आणि अग्रिमे प्रदान करण्याची प्रक्रिया. |
| १० | गट ड - भ.नि.नि | राज्य शासकीय गट ड कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे ठेवण्याकरीता प्रणाली. |
| ११ | वेतनिका | वेतन पडताळणी केलेल्या सेवापुस्तकांची विभागवार माहिती. |
| १२ | बील पोर्टल | केंद्रीय सर्व्हरव्दारे वेतन देयके वगळता इतर सर्व देयके तयार करणे. |
| १३ | जीएसटी ग्रास पोर्टल | राज्य वस्तू व सेवा कराच्या रकमेचे लेखांकन व ताळमेळ करणे. |

## १. कोषवाहिनी :

स्थानिक कोषागारात तयार झालेल्या लेख्यासंबंधातील माहिती दर्शविण्याकरिता ही प्रणाली राष्ट्रीय सूचना केंद्र, पुणे यांनी विकसित केली आहे. हे संकेतस्थळ सर्व इंटरनेट धारकांसाठी खुले आहे. या पोर्टलवर कोषागारातील प्रदाने, योजनानिहाय जमा व खर्च, प्रलंबित देयके इत्यादी तपशिल उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

महालेखापाल मुंबई व नागपूर यांचेकरीता वेतन व निवृत्तीवेतनासंबंधीचा डेटा डाऊनलोड करण्याच्या अनुषंगाने दोन्ही महालेखापाल कार्यालयांची जोडणी / एकात्मिकरण कोषवाहिनीमध्ये करण्यात आले आहे. तसेच अंतिम मंजूर निवृत्तीवेतन प्रकरणांचा डेटा कोषवाहिनीवर अपलोड करण्याची सुविधा महालेखापाल कार्यालयास उपलब्ध करुन दिल्याने राज्यातील सर्व कोषागार कार्यालयांमध्ये सदर डेटा उपलब्ध होत आहे.

त्याचप्रमाणे अर्थवाहिनीवरील VLC डेटा डाऊनलोड करण्याकरिता महालेखापाल कार्यालयास Login उपलब्ध करुन देण्यात आले आहे. राज्य शासनाने सर्व शासकीय विभाग / कार्यालये यांस निवृत्तीवेतन प्रकरणे तयार करण्याकरिता Online सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या संकेतस्थळाचा URL https://koshwahini.mahakosh.gov.in हा आहे.

## २. ट्रेझरीनेट :

ट्रेझरीनेट प्रणाली ही राष्ट्रीय सूचना केंद्र, पुणे यांनी विकसित केलेली कोषागाराच्या लेखांकनासंबंधातील प्रमुख प्रणाली आहे. ही प्रणाली नियमाधारीत असुन याद्वारे नवीन अभिकर्त्यांचा समावेश करणे /तयार करणे आणि विविध अभिकर्त्यांना कार्ये निश्चित करता येतात. आवश्यक माहिती मिळविण्याकरिता आणि ती प्रसारित करण्याकरिता ही प्रणाली अन्य प्रणालीमध्ये समाविष्ट होऊ शकते. सद्यस्थितीत ट्रेझरीनेट प्रणाली सेंट्रल सर्व्हरवर प्रस्थापित करण्यात आली असून त्यावर अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, ३२३ उपकोषागार कार्यालये व ३४ जिल्हा कोषागार कार्यालये थेट कार्यरत आहेत.

आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या देयकांची पोहोच ट्रेझरीनेटद्वारे देण्यात येते. कोषागारामध्ये विविध टप्प्यांवर ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने देयकांचे लेखा परीक्षण करुन देयके मंजुर करण्यात येतात व रकमेचे प्रदान थेट आहरण व संवितरण अधिकारी/ कर्मचारी/निवृत्तीवेतनधारक/ त्रयस्थ अदाता यांच्या बँक खात्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने RBI e-Kuber प्रणालीव्दारे व SBI-CMP पोर्टलद्वारे करण्यात येतात. अपवादात्मक परिस्थितीमध्ये धनादेश निर्गमित करण्यासाठी, धनादेश निर्गमित करण्याची पद्धत चालू ठेवण्यात आली आहे. बँकेकडून इलेक्ट्रॉनिक स्क्रोल प्राप्त केले जातात, त्याप्रमाणे जमेची माहिती प्रणालीमध्ये समाविष्ट होते.

सर्व कोषागारांतुन ट्रेझरीनेट प्रणालीमधुन अर्थवाहिनी पोर्टलमध्ये माहिती जमा केली जाते आणि त्यामुळे विविध लेखाशिर्षाखालील जमा आणि खर्चाच्या रकमेची एकत्रित स्थिती दर्शविणे शक्य होते.

तसेच महालेखापालांना सर्व जमा व खर्च व्यवहाराची/प्रमाणकांची माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये नव्याने Static IP, Real Time Vr. No, e-Token , e-Advice, e-Hastkashar, e-Bill & e-Voucher, OTP based Login या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच RBI e-Kuber Payment Mode पूर्ण राज्यात यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आला आहे.

## ३. बीम्स :

अर्थसंकल्पीय अंदाज, अनुदानाचे वितरण आणि वितरित अनुदानानुसार खर्च प्राधिकृत करण्यासाठी ही संगणकीय प्रणाली आहे. यामध्ये विविध टप्प्यांवरील निधीचे हस्तांतरण जसे वाटप, वितरण, पुनर्विनियोजन, आहरण, अनुदान परत करणे इत्यादी कार्ये करण्यात येतात. विधानमंडळामध्ये मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचा समावेश असलेली ई-बजेट फाईल या प्रणालीमध्ये अपलोड करण्यात येते. ही फाईल वित्त विभागातील अर्थसंकल्प शाखेमार्फत अन्य विभागांना अनुदान वितरित करण्यासाठी उपलब्ध होते.

शासनाच्या सर्व विभागांना मागणी क्रमांक निहाय प्राप्त झालेले, वाटप झालेले व शिल्लक राहिलेले अनुदान पाहणे शक्य होते. खर्चाच्या प्राधिकारासंबंधातील विकल्प हा आहरण व संवितरण अधिका-यांकडे उपलब्ध आहे. कोषागारामध्ये सादर होणा-या प्रत्येक देयकासोबत बीम्सद्वारे तयार झालेली प्राधिकारपत्रे जोडणे आवश्यक आहे. या प्राधिकारपत्रांमध्ये अर्थसंकल्प वर्गीकरण, ठोक रक्कम, वजाती, निव्वळ रक्कम, अदात्याचा तपशील इत्यादींचा अंर्तभाव आहे.

बीम्स प्रणालीमध्ये, सार्वजनिक बांधकाम विभाग व PFMS पोर्टल यांचे एकात्मिकरण करण्यात आले आहे, ज्यायोगे लाभार्थींच्या खात्यामध्ये प्रदान करणे शक्य होणार आहे. बीम्स प्रणालीसह माहिती तंत्रज्ञान विभागाच्या DBT पोर्टल यांचे एकात्मिकरण करण्यात आले आहे, ज्यायोगे लाभार्थी विद्यार्थ्याच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम थेट जमा करणे शक्य होईल. बीम्सवर प्रणालीवर Virtual PLA प्रणाली जलसंपदा विभागाच्या ५ महामंडळांसाठी विकसित करून कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या संकेतस्थळाचा URL https://beams.mahakosh.gov.in हा आहे.

## ४. ग्रास : (गव्हर्नमेंट रिसिट अकाऊंट सिस्टिम)

माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन कर व करेतर रकमा ऑनलाईन पध्दतीने 'ग्रास' प्रणालीद्वारे भरण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जमा होणाऱ्या रकमांचा हिशोब ठेवणे, मासिक लेखे महालेखापाल मुंबई कार्यालयास सादर करणे व प्रणालीचे प्रशासकीय कामकाज करण्यासाठी शासन निर्णय वि.वि. दि.२८/०५/२००८ अन्वये व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालयाची निर्मिती केली आहे.

ग्रास प्रणालीसोबत इंटिग्रेशन झालेल्या १२ बँकेकडून त्याचप्रमाणे ईपेमेंट गेटवेद्वारे बँकाकडून इलेक्ट्रॉनिक स्क्रोल प्राप्त करुन रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडून प्राप्त झालेल्या स्क्रोलशी पडताळणीअंती जमेची माहिती प्रणालीमध्ये समाविष्ट होते.

'ग्रास' प्रणालीची सुरूवात माहे जून २०१० मध्ये झाली असून सुरवातीस एक शासकीय विभाग व पाच राष्ट्रीयीकृत बँका सहभागी होत्या. आज 'ग्रास' प्रणालीवर एकूण ७३ विभाग/कार्यालये, १२ राष्ट्रीयीकृत बँका व SBI PAYMENT GATEWAY, IDBI BANK - BILLDESK, BANK OF BARODA-NSDL हे पेमेंट गेटवे सहभागी आहेत. यामाध्यमातून नागरिकांना प्रदानाचे अनेक पर्याय (Multiple payment options) उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

ग्रासप्रणालीद्वारे दोन पद्धतीने ई-चलन भरणा करता येते :

१. नोंदणी न करता( Pay Without Registration )

२. नोंदणी करून ( As a Registered User )

ग्रास प्रणालीमध्ये सहभागी झालेल्या विभागांना/कार्यालयांना ग्रास प्रणालीत ई चलन पडताळणी (Challan Verification) करणे, ई चलनांचा ताळमेळ घेणे, ईचलन विरुपीकरण (Challan Defacement) करणे, ईचलन परतावा नोंद (Challan Refund Entry) करणे, ई-चलनावरील विरुपीकरणाची नोंद रद्द करण्यासाठी (Revocation), चुकीच्या वर्गीकरणाची दुरुस्ती (Misclassification) करुन देणे, ई-जमेचा लेखांकन करणे, तसेच ईचलनांचा तपशिल डाउनलोड करण्यासाठी (Scroll Download) सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

तसेच नोंदणीकृत विभागांना त्यांच्या लॉग-इन मध्ये विविध अहवाल जसे की; रोख लेखा (Cash Account), बाह्य परिशिष्ट (Covering Schedules), दैनिक रोख वही (Daily Cash Book), एकूण जमा (Total Receipts), विरुपण अहवाल (Defacement Report), परतावा अहवाल (Refund Report) , त्याचप्रमाणे यशस्वी झालेले तथापि स्क्रोल मध्ये समाविष्ट नसलेले चलनावरील सी.आय.एन. (CIN) चा अहवाल (CIN NOT IN SCROLL), अवेटेड स्क्रोलचा अहवाल, रिव्होक अहवाल, इ. उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

ग्रास प्रणालीशी निगडीत ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी व त्यांना आवश्यक सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी Helpdesk काउंटर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याद्वारे ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण तसेच सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

### ५. अर्थवाहिनी :

अर्थवाहिनी ही कोषागारातील जमा व खर्चाचे लेखे, मास्टर डाटा व ट्रेझरीनेट प्रणालीचे व्यवस्थापन व नियंत्रण करण्यासाठीची माहिती पेढी आहे. या प्रणालीमार्फत कोषागारांमध्ये वापरात असलेल्या ट्रेझरीनेट प्रणालीवर व्यवस्थापन व नियंत्रण करण्यात येत असते. तसेच या प्रणालीमध्ये आवश्यक असलेला मास्टर डाटा ठेवण्यात आलेला असुन त्यामध्ये सुविधेप्रमाणे बदल केले जात असतात.

अर्थवाहिनी या प्रणालीतुन कोषागारनिहाय जमा व खर्चाचे माहवार लेखांकन आकडेवारी डाऊनलोड करण्याकरीता महालेखापाल कार्यालयास लॉगइन ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. कोषागारातून करावयाच्या प्रदानाकरिता डिजिटल स्वाक्षरीसह प्रदान प्राधिकारपत्र निर्गमित करणेकरिता A. G. मोड्युल विकसित करण्यात आले आहे.

६. **सेवार्थ:**

सेवार्थ ही सर्व राज्य शासकीय कर्मचा-यांकरीता वेतन अदा करण्याची प्रणाली आहे. शासनाने सर्व शासकीय कर्मचा-यांच्या वेतनाचे प्रदान या प्रणालीव्दारे करणे अनिवार्य केले आहे. सेवार्थ प्रणाली बीम्स, ट्रेझरीनेट, अर्थवाहिनी, सीएमपी, ई-कुबेर प्रणालीसोबत संलग्न करण्यात आलेली आहे. सदर प्रणालीमध्ये खालील सुविधांचा समावेश आहे.

१) अर्थसंकल्पीय योजना संकेतांक तसेच आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक निहाय कार्यालयांची नोंदणी.

२) संबंधित प्रशासकीय विभागामार्फत पदांचे केंद्रीय वाटप.

३) प्रशासकीय विभागाव्दारे प्रत्येक कार्यालयाकरीता मंजुर पदांची नोंद करणे.

४) कर्मचा-यांची नोंदणी आणि युनिक एम्पलॉई आयडी (सेवार्थ आयडी/डीसीपीएस आयडी) देणे

५) कर्मचाऱ्यांना अदा करण्यात येणारे भत्ते व त्यांच्या वेतनातील वजातींची नोंद करणे.

६) शासनाने दिलेल्या कर्ज व अग्रिमांची वसुली.

७) मासिक वेतन देयकातील बदलाचे विवरण पत्र तयार करणे व त्यानुसार मासिक वेतन देयक तयार करणे .

८) पुरवणी देयके तयार करणे.

९) कर्मचाऱ्यांकरीता एम्प्लॉई कॉर्नर.

१०) महालेखापाल कार्यालयास तसेच प्रशासकीय विभागास आवश्यकतेप्रमाणे विविध अहवाल तसेच प्रशासकीय विभागांस मंजूर पदांचे, रिक्त व भरलेल्या पदांचे अहवाल पाहण्यासाठी सेवार्थ प्रणालीमध्ये लॉगइन उपलब्ध करुन दिले आहे.

पथदर्शी प्रकल्पांतर्गत नाविन्वपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व समावेशक सुविधासह एकात्मिक सेवार्थ प्रणाली नव्याने विकसित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

७. निवृत्तीवेतन वाहिनी :

महाराष्ट्र राज्य शासकिय निवृत्तवेतनधारकांकरीता ही केंद्रीय वेब बेस्ड आज्ञावली आहे. या प्रणालीची मुख्य कार्ये खालील प्रमाणे आहेत.

१. कोषागारातील निवृत्तीवेतनधारकांची ओळख आणि निवृत्तीवेतनाच्या प्रथम प्रदानाच्या प्रक्रियेची (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण मुल्य आणि मृत्यु-नि-सेवा-उपदान यासह) ऑनलाईन पावती महालेखापाल कार्यालयाकडून प्राप्त होते.
२. मासिक निवृत्तीवेतन देयक आणि बदलाचे विवरण पत्र तयार होते.
३. वार्षिक हयातीचे दाखले - जमा आणि अद्यावत करणे.
४. निवृत्तीवेतन प्रदान आदेशांचे कोषागारांतर्गत / महालेखापाल कार्यालयांतर्गत हस्तांतरण.
५. विहीत देयक नमुने.
६. निवृत्तीवेतनधारकांकरीता पेन्शनर्स कॉर्नर.
७. बाह्यप्रणालींसह एकात्मीकरण.

निवृत्तीवेतन आज्ञावली मार्फत सेवानिवृत्त कर्मचा-यांची निवृत्तीवेतन प्रकरणे ऑनलाईन पद्धतीने महालेखापाल कार्यालयास पाठविण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी यांना लॉगीन उपलब्ध करून देण्यात आले आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी पाठविलेल्या ऑनलाईन निवृत्तीवेतन प्रकरणावर कार्यवाही करून सेवानिवृत्त कर्मचा-यांची माहिती ऑनलाईन निवृत्तीवेतन वाहिनीमध्ये अपलोड करण्याची सुविधा दोन्ही महालेखापाल कार्यालयांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. महालेखापाल कार्यालयांकडून निवृत्तीवेतन प्रदान आदेश (PPO) तयार करण्यात आल्यानंतर नमुना अ,ब,क व ४२-अ निवृत्तीवेतन वाहिनीमध्ये अपलोड करण्याची सुविधा आहरण व संवितरण अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांसाठी सुधारीत अंशराशीकरण प्रकरणे ऑनलाईन करण्याच्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी, महालेखापाल कार्यालय, कोषागार कार्यालय यांच्या लॉगीन वर सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि. २४.०८.२०२३ अन्वये महालेखापाल मुंबई यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि सर्व १५ जिल्हा कोषागार कार्यालयासांठी e-PPo, e-GPO, e-CPO प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. निवृत्तीवेतन धारकांना त्यांच्या वैयक्तिक लॉगीनमध्ये उत्पनाचा दाखला, मासिक तसेच वार्षिक निवृत्तीवेतन प्रदान तपशील पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या संकेतस्थळाचा URL https://pension.mahakosh.gov.in/login.jsp हा आहे.

८. **राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना:**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.दि.३१.१०.२००५ नुसार दि.०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. परिभाषित अशंदान निवृत्तीवेतन योजनेतील सर्व कर्मचाऱ्यांचा वित्त विभाग शासन निर्णय दि.२७.०८.२०१४ नुसार दि.०१.०४.२०१५ पासून राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत सेवार्थ आज्ञावलीमार्फत खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

१. कर्मचाऱ्यांची NPS सभासद नोंदणी करणे.
२. कर्मचाऱ्यांची मासिक अंशदानाची Subscribers Contribution File (SCF) तयार करून CRA आज्ञावलीवर अपलोड करून मासिक अंशदानाची देयके तयार करणे.
३. मासिक अंशदानाच्या वजातीबाबतची वार्षिक विवरणपत्रे (R३) तयार करणे.
४. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे गहाळ रकमांची (Missing Credit) नोंद घेणे.
५. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर २ मधील परतावा प्रकरणांची देयके तयार करणे.
६. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर २ मधील प्रलंबित परतावा प्रकरणांचा तपशील.

९. **शासकीय कर्मचाऱ्यांकरिता कर्जे व अग्रिम मोड्यूल :**

हे मोड्यूल सर्व आहरण व संवितरण अधिका-यांसाठी कार्यान्वित करण्यात आले आहे. शासकीय कर्मचाऱ्यांकरिताच्या सर्व प्रकारच्या अग्रिमांकरिता संपूर्ण कार्यवाहीच्या प्रक्रियेचे ऑटोमेशन या प्रणालीद्वारे होते. ही प्रणाली पूर्णपणे सेवार्थशी संलग्न आहे. सदर प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने मागणी नोंदवून प्रणालीमधुनच देयके व मंजुरी आदेश तयार होतात. अग्रिमांच्या निश्चित केलेल्या हप्त्यांच्या वसुलीची कार्यवाही या प्रणालीमार्फत केली जाते. अग्रिमाची वसुली न होण्याच्या शक्यता कमी करणे हा या प्रणालीचा उद्देश आहे.

१०. **गट ड कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी आज्ञावली :**

ही प्रणाली महाराष्ट्र शासनाच्या गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या अभिलेख्यांच्या संगणकीकरण प्रयोजनार्थ तयार करण्यात आली आहे. सदर प्रणाली सर्व आहरण व संवितरण अधिका-यांसाठी कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर आज्ञावली कार्यप्रवाहावर आधारित असून ती संपूर्णपणे सेवार्थशी संलग्न आहे. भविष्य निर्वाह निधी अग्रिमाकरिता अर्ज आणि मंजूरी करिता ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. महालेखापाल कार्यालयाकडून गट-ड कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा लेखा ठेवण्यात येत नसल्याने अर्थसंकल्पीय उद्दीष्टाकरिता महालेखापाल कार्यालयास इलेक्ट्रॉनिक डेटा उपलब्ध करुन दिला जातो.

## ११. वेतनिका :

सुधारित वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करुन त्याची पडताळणी करण्यासाठी वेतनिका प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मुंबई येथे संचालक, लेखा व कोषागारे स्तरावर, तसेच विभागीय सह संचालक, लेखा व कोषागारे स्तरावर (कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर) याठिकाणी वेतन पडताळणी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकांकडुन त्या त्या विभागातील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची वेतन आयोगानुसार करण्यात आलेल्या वेतननिश्चितीची पडताळणी करण्यात येते. तसेच वेतन पडताळणी साठी सेवापुस्तके पाठविण्यासाठी वेतनिका प्रणाली अनिवार्य करण्यात आलेली आहे. वेतन पडताळणीसाठी सादर झालेल्या सेवापुस्तकांची सद्यस्थिती पाहण्याची सुविधा कर्मचाऱ्यांना तसेच त्यांच्या कार्यालयांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

## १२. बील पोर्टल:

बील पोर्टल ही आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सर्व प्रकारची देयके इलेक्ट्रॉनिक फॉरमॅट मध्ये तयार करण्याकरिताची नावीन्यपूर्ण आज्ञावली आहे. वेतन आणि निवृत्तीवेतन देयके वगळता, इतर सर्व २७ प्रकारची देयके या प्रणालीमधून तयार करण्यात येतात.  बील पोर्टल हा बीम्स प्रणालीचा अंतर्गत भाग आहे.  बील पोर्टलमधून देयक तयार करण्याकरिता आहरण व संवितरण अधिकारी यांना लॉग-इन करणे आवश्यक आहे.  देयक तयार करतांना बहुतांश माहिती ही मास्टर डेटा फाईल मधून घेण्यात येते, त्यामुळे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अत्यल्प माहिती भरावी लागते. अर्थसंकल्पीय अनुदानावरही या प्रणालीद्वारे लक्ष ठेवण्यात येते.  प्रत्येक मागणीची अचूकता निश्चित करण्याकरिता या प्रणालीमध्ये लेखा परीक्षणाच्या अधिकतम मुद्यांचा समावेश करण्यात आला आहे.  तसेच अधिकारी / कर्मचारी यांना त्यांची वैयक्तिक मागणी जसे वैद्यकीय देयक, प्रवास भत्ता प्रतिपूर्ती देयक, रजा प्रवास सवलत देयक, भविष्य निर्वाह निधी अग्रीम देयक यांसाठी मागणी तयार करुन त्यांचे आहरण व संवितरण करण्याची सुविधा बील पोर्टल प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सर्व देयकांची (उदा. प्रवास भत्ता, वैद्यकीय प्रतिपुर्ती इ.) आहरण व संवितरण अधिकारी यांनी भरलेली माहिती बघण्याची सुविधा व विविध बील रजिस्टर्स (उदा. दूरध्वनी,वीज,पाणी इ.) ऑनलाईन तयार करण्याची सुविधा अधिदान व लेखा कार्यालयास उपलब्ध करून देण्यात आली आहे. भविष्यात ह्या सुविधा सर्व कोषागारांमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील.

प्रत्येक देयक ५ भागांमध्ये विभाजित करण्यात आले आहे.

१) लेखाशीर्ष माहिती

२) देयकाचा मुख्य गाभा

३) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली अदात्याची माहिती

४) कोषागार कार्यालयाचे अभिप्रायाकरिता जागा

५) महालेखापाल कार्यालयाचे अभिप्रायाकरिता जागा

पथदर्शी प्रकल्पांतर्गत ई-बील व ई-व्हाउचर प्रकल्प (e-Bill & e-Voucher Project ) प्रायोगिक तत्वावर कमी जोखमीच्या देयकांकरिता प्रथम टप्प्यात कार्यान्वित करण्यात आलेला आहे. सदर प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे पेपरलेस e-Bill व पेपरलेस e-Voucher हा कोषागारे संगणकीकरणाचा महत्वाचा टप्पा गाठणे शक्य होणार आहे.
या संकेतस्थळाचा URL https://billportal.mahakosh.gov.in/BillPortal/ असा आहे.

### १३. जीएसटी ग्रास पोर्टल :

केंद्र शासनाने वस्तू व सेवा कराची (GST) अंमलबजावणी दिनांक ०१ जुलै २०१७ पासून केली आहे. या अंतर्गत राज्य वस्तू व सेवा (SGST) रकमांचे लेखांकन व ताळमेळ करण्यासाठी जीएसटी-ग्रास या नावाने स्वतंत्र प्रणाली विकसित केली आहे. त्यानुसार राज्य वस्तू व सेवा कराच्या (SGST) रकमांचे लेखांकन व ताळमेळ जीएसटी ग्रास या प्रणालीमार्फत करण्यात येत आहे. यासाठी केंद्र शासनाच्या Goods & Service Tax Network (GSTN) व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या e-Kuber या दोन प्रणालींचे Integration करण्यात आले आहे. माहे जुलै २०१७ पासून राज्य वस्तू व सेवा कराच्या (SGST) रकमांचा लेखा व्हर्च्युअल ट्रेझरीमार्फत महालेखापाल, मुंबई कार्यालयास सादर केला जातो. भारतीय रिझर्व्ह बँकेत ऑनलाईन MoE (Memorandum Of Error ) सादर करण्यासाठी व त्यांचे Resolution करण्यासाठी MoE Module चा विकास पूर्ण झालेला असून RBI च्या ई-कुबेर प्रणालीशी चाचणी पूर्ण झाल्यानंतर सदर Module live केले जाईल.

# प्रकरण क्रमांक ३

# व्हर्च्युअल ट्रेझरी

## शासकीय जमा लेखांकन पद्धती (Government Receipt Accounting System)

राज्य शासनाद्वारे वित्त विभागाच्या नियंत्राणाखाली व संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखाली व्हर्च्युअल ट्रेझरी मुंबई या नवीन कार्यालयाची सन २००८ मध्ये स्थापना करण्यात आले आहे. इंटरनेट बँकींग सुविधेचा वापर करून जनतेला कर व करेतर रकमा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून शासकीय जमा लेखांकन प्रणालीद्वारे (GRAS) https://gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळामार्फत भरण्याची सुविधा शासनाने उपलब्ध करून दिलेली आहे. बँकींग क्षेत्रात होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स बँकींग सुविधेचा वापर व बँकांच्या ई-पेमेंट गेटवे पद्धतीचा उपयोग या प्रणालीत करण्यात आला आहे.

राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचे मार्फत सदर प्रणाली विकसीत केली आहे. शासनाकडे जमा होणाऱ्या रकमांच्या लेखांकनासाठी व ताळमेळासाठी अवलंबण्याची प्रचलीत कार्यपद्धती महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेमध्ये विहीत केलेली आहे. तथापि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करून शासनास देय रकमा जमा करण्याची नवीन प्रणाली अस्तित्वात आली आहे. सध्या प्रचलीत पद्धतही चालू रहाणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करून पेमेंट गेटवे मार्फत जमा होणाऱ्या रकमांच्या जमा लेखांकनासाठी, ताळमेळासाठी व व्यवस्थापनेसाठी व्हर्च्युअल ट्रेझरीची स्थापना करण्यात आली आहे. सद्यस्थितीत व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई या कार्यालयासाठी एकूण १८ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

संगणकाद्वारे "ई पेमेंट गेट वे" चा वापर करून कर व करेतर रक्कम भरणा करण्याकरिता तसेच परंपरागत जमा पद्धतीप्रमाणे बँकेच्या खिडकीवर रक्कम भरणा करण्या करिता चलन तयार करून ते मुद्रीत करण्यासाठी शासनाच्या GRAS संकेतस्थळावर सोय करून देण्यात आली आहे. याकरिता सर्व विभागांशी संबंधीत कर व करेतर रकमा भरणे सोयीचे व्हावे या करिता चलनाच्या नमुन्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. या प्रणालीद्वारे शासनाच्या सर्व विभागांद्वारे वसूल करण्यात येणाऱ्या महसुली जमा रकमा ई-पेमेंट गेट वे चा वापर करून परस्पर शासन खजिन्यात शीघ्रतेने जमा करता येणे शक्य आहे. सदर कोषागार हे सन २००८ पासून कार्यरत असून विद्यमान ग्रास प्रणालीचे लोकार्पण माहे जून २०१० मध्ये करण्यात आले. सदर प्रणालीमुळे या कार्यालयाची वाढ ही प्रचंड मोठया प्रमाणात होत असून अदात्यास / करदात्यास घरी बसून ई-चलनाद्वारे कराची रक्कम २४ X ७ या तत्वावर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

## १. प्रणालीतील सहभागी शासकीय कार्यालये:

सध्या पुढील शासकीय विभाग/कार्यालये **"ग्रास"** प्रणालीत समाविष्ट आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | राज्य उत्पादन शुल्क | ३३ | पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई |
| २ | संचालनालय, लेखा व कोषागारे | ३४ | निबंधक भागिदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३ | नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक | ३५ | आयुक्त पशुसंवर्धन |
| ४ | परिवहन विभाग | ३६ | आयुक्त मत्स्य व्यवसाय |
| ५ | सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग | ३७ | महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था |
| ६ | कामगार आयुक्त | ३८ | दुग्धव्यवसाय विकास आयुक्तालय |
| ७ | संचालनालय औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | ३९ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग |
| ८ | विमा संचालनालय | ४० | पोलीस महासंचालक |
| ९ | संचालनालय बाष्पके | ४१ | आरोग्य सेवा संचालनालय |
| १० | जिल्हा व सत्र न्यायालय, मुंबई | ४२ | स्पेशल कोर्ट टॉर्टस्, मुंबई |
| ११ | अन्न व औषध प्रशासन | ४३ | साखर संचालनालय, पुणे |
| १२ | उच्च न्यायालय | ४४ | मुख्य वनसंरक्षक, नागपुर |
| १३ | कृषी आयुक्तालय | ४५ | गृह विभाग (मंत्रालय) |
| १४ | माहिती वजनसंपर्क महासंचालनालय | ४६ | अल्पसंख्यांक विभाग |
| १५ | जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख | ४७ | पर्यटन विभाग |
| १६ | मुख्यन्याय दंडाधिकारी, मुंबई | ४८ | राज्य निवडणुक आयोग |
| १७ | वित्त विभाग (मंत्रालय) | ४९ | आयुक्त वस्त्रोद्योग |
| १८ | नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई | ५० | राज्यपाल सचिवालय |
| १९ | महसूल विभाग | ५१ | मंत्रालय चौरस आहारगृह व कँटीन |
| २० | सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत), म.रा., मुंबई | ५२ | पणन संचालनालय |
| २१ | लघुवाद न्यायालय, मुंबई | ५३ | दिव्यांग आयुक्तालय |
| २२ | विक्रीकर आयुक्त | ५४ | सहकार आयुक्त आणि निबंधक,सहकारी संस्था |
| २३ | नियंत्रकवैध मापनशास्त्र | ५५ | राज्य परिवहन अपील न्यायाधिकरण |
| २४ | शिक्षण संचालनालय | ५६ | महाप्रशासक व शासकीय विश्वस्त |
| २५ | भुविज्ञान व खनिकर्म, संचालनालय | ५७ | संचालक, उच्च शिक्षण |
| २६ | राज्य ग्राहक वाद निवारण आयोग | ५८ | संचालक तंत्रशिक्षण |
| २७ | पोलीस आयुक्त, मुंबई (वाहतुक) | ५९ | मोटार अपघात दावा विभाग |
| २८ | लाचलुचपत प्रतिबंधक संचालनालय | ६० | ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| २९ | संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन | ६१ | अभियोग संचालनालय |
| ३० | नगर रचना व मुल्यनिर्धारण संचालनालय | ६२ | नगर परिषद संचालनालय |
| ३१ | औद्योगिक न्यायालय | ६३ | सामान्य प्रशासन विभाग |
| ३२ | कामगार न्यायालय | ६४ | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय |

वरील विभागांच्या महसुली/रकमा GRAS प्रणालीमार्फत जमा करणे व अशा जमा रकमांचे लेखांकन करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. ग्रास प्रणालीद्वारे शासनाचा १००% महसूल हा ग्रास प्रणालीमधून भरण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरून शासनाच्या सर्व विभागांना अर्धशासकीय पत्राद्वारे दि.०८.०९.२०२३ द्वारे अवगत करण्यात आले आहे. शासन निर्णयान्वये एप्रिल २०२० पासून शासनाचे सर्व विभागाचा महसुल ग्रास प्रणालीद्वारे भरणा करण्याचे सक्तीचे करण्यात येत आहे. त्यामुळे व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालयाचे कामकाजात वाढ होणार आहे. त्याअनुषंगाने सद्यस्थितीत ६४ विभाग/कार्यालय, १२ राष्ट्रीयकृत बँका व ०३ पेमेंट गेट-वे ग्रास प्रणालीत समाविष्ट आहेत.

## २. प्रणालीतील समाविष्ट राष्ट्रीयीकृत बँका :

शासकीय जमा लेखांकन प्रणालीद्वारे (GRAS) रकमांचा भरणा करण्यासाठी सध्या पुढीलप्रमाणे राष्ट्रीयीकृत बँका प्राधिकृत करण्यात आल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | युनियन बँक ऑफ इंडिया (आंध्र बँक व कॉर्पोरेशन बँक ) | ७. | इंडियन ओव्हरसीज बँक |
| २. | इंडियन बँक (अलाहाबाद बँक) | ८. | बँक ऑफ महाराष्ट्र |
| ३. | आय.डी.बी.आय. बँक | ९. | युको बँक |
| ४. | बँक ऑफ इंडिया | १०. | पंजाब नॅशनल बँक (ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स) |
| ५. | बँक ऑफ बडोदा (देना बँक व विजया बँक) | ११. | कॅनरा बँक ( सिंडिकेट बँक) |
| ६. | स्टेट बँक ऑफ इंडिया | १२. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |

SBI ePay Payment Gateway - सर्व प्रकारच्या डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे रकमा भरणा करण्याची सुविधा SBI ePay पेमेंट गेटवे मार्फत ग्रास प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच आयडीबाय बँक, BILL DESK, बँक ऑफ बडोदा NSDL, Payment Gateway ला शासनाने मान्यता दिली असून दि.१८.०८.२०२३ पासून ग्राहकांना/नागरिकांना Live करण्यात आले असून याद्वारे ग्राहकांना/नागरिकांना प्रदानाचे अनेक पर्याय (Multiple Payment Option) उपलब्ध करुन देण्यात आले आहे. ग्रास प्रणालीद्वारे २ पध्दतीने ई-चलन भरणा करण्यात येते. १.नोंदणी न करता (Pay without Registration २. नोंदणी करुन (As a Registered User)

Mode of Payment UPI- वित्तीय वर्ष २०२१-२२ मध्ये ग्रास प्रणालीमध्ये रकमा भरणा करण्याची सुविधा UPI मार्फत ग्रास प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## ३. प्रणालीचे विकसन व सुरक्षा :

सदर प्रणाली राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्य सहकार्याने विकसीत करून घेण्यात आली असून, सर्व प्रकारच्या सुरक्षिततेची हमी मिळवण्याच्या दृष्टीने संपूर्ण प्रणालीचे लेखा परिक्षण (System Audit) या क्षेत्रातील तज्ञ अशा एस.टी.क्यू.सी., पुणे या केद्र शासनाच्या संस्थकडून तसेच Empaneled Member असलेली खाजगी संस्था मे. कंट्रोल केस, मुंबई यांचेकडून करवून घेण्यात आले आहे. तसेच सदर प्रणालीतील माहितीच्या सुरक्षिततेकरिता विशिष्ट पोर्टद्वारे प्रणालीत प्रवेश करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ई-चलनाने जमा होणाऱ्या रकमांचे हिशोब ठेवण्यासाठी संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या अधिनस्थ व्हर्च्युअल ट्रेझरी या कार्यालयाची स्थापना मुंबई येथे करण्यात आली असून त्याच्या कामाची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यात असल्यामुळे दैनंदिन कामकाजामध्ये फार मोठया प्रमाणात वाढ होणार आहे. व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालयास दैनंदिन जमा रकमांचे लेखाशीर्ष, उपशिर्ष प्रमाणे वर्गीकरण करून लेखांकन करणे, पडताळणी करणे, प्रत्यक्ष जमेचे लेखे तयार करणे तसेच सहभागी बँका, भारतीय रिझर्व्ह बँक यांचेबरोबर जमा रकमांचे ताळमेळ इत्यादी कर्तव्ये पार पाडावयाची आहेत. सदर कार्यालयाचे मासिक लेखे महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात येतात. व्हर्च्युअल ट्रेझरी या कोषागाराचे कामकाज हे संगणीकृत असल्यामुळे ग्रास प्रणालीमार्फत जमा होणाऱ्या रकमांचा ताळमेळ घेण्याचे काम हे अधिक सुलभ व जलद गतीने तसेच सुरक्षित पद्धतीने होत आहे. ग्रास प्रणालीशी निगडीत ग्राहकांच्या तक्रारीची दखल घेण्यासाठी व त्यांना आवश्यक सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी Helpdesk काउंटर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याद्वारे ग्राहकांना दूरध्वनी/भ्रमणध्वनीवरुन तसेच ई-मेल व whats app वरुन तक्रारीचे निवारण /सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

## ४. वैश्विक वापर:

या प्रणालीचा वापर करून कुठूनही, कधीही महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यातील, कोणत्याही विभागाशी संबंधीत महसूली तसेच इतर जमा रकमा शासन खाती भरण्याची सुविधा करदाते व इतर व्यक्ती, संस्था तसेच शासकीय कार्यालये इत्यादींना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ग्रास प्रणालीद्वारे १००% महसुल जमा होणार असल्यामुळे वापरकर्त्यांमध्ये वाढ होणार आहे. तसेच ग्रास प्रणालीमार्फत रू.२,००१/- ते १,००,०००/- पर्यंतच्या डेबीट कार्डद्वारे होणाऱ्या व्यवहारांवर एम.डी.आर. शुल्काची रक्कम या कार्यालयामार्फत एस.बी.आय.पेमेंट गेट वे ला अदा करण्यात येते. त्याचप्रमाणे सन २०२३-२४ मध्ये आयडीबीआय बँक, BILL DESK, बँक ऑफ बडोदा NSDL, Payment Gateway मध्ये MDR शुल्काची मागणी होणार असल्याने "संगणकावरील खर्च" या उद्दिष्टाखाली होणाऱ्या खर्चात वाढ होणार आहे. याबाबतची मागणी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये करण्यात आली आहे.

वर्षनिहाय ग्रास प्रणालीद्वारे जमा महसूलाचे विवरण खालील प्रमाणे आहे. या आकडेवारीरून कोषागाराकरिता महिना निहाय चलन संख्या व प्रत्यक्ष जमा महसूल यांची माहिती मिळते. तसेच त्यावरून ग्रास प्रणालीच्या कामकाज व वापराचा वाढता आलेख स्पष्ट दिसून येतो.

| वित्तीय वर्ष | चलन संख्या | रक्कम (कोटीत) |
|---|---|---|
| २०१३-२०१४ | १७६५१४३ | २७,०४४.०० |
| २०१४-२०१५ | ५५७२३१३ | ३५,०४४.०० |
| २०१५-२०१६ | ७११९९४८ | ४६,०८२.०० |
| २०१६-२०१७ | ८३८०६९६ | ४८,७५७.०० |
| २०१७-२०१८ | १०४८६३६६ | ७४,८०३.०० |
| २०१८-२०१९ | ११५६५४८५ | १,०७,५३३.०० |
| २०१९-२०२० | ६५३४६४७ | ६२,८२९.५२ |
| २०२०-२०२१ | ११४२९०१८ | ९७,३७६.६२ |
| २०२१-२०२२ | १२२३८०८६ | १,२७,३९२.३२ |
| २०२२-२०२३ | १४२४५६८६१ | ८६०६३.८८ |
| २०२३-२०२४ (माहे सप्टेंबर २०२३ पर्यंत) | ७०९५०९९ | ७४,९६३.६३ |
| **एकूण** | **२२४६४३६६२** | **७,८७,८८८.९७** |

## ५. जीएसटी ग्रास पोर्टल :

केंद्र शासनाने वस्तू व सेवा कराची (GST) अंमलबजावणी दिनांक ०१ जुलै २०१७ पासून केली आहे. या अंतर्गत राज्य वस्तू व सेवा (SGST) रकमांचे लेखांकन व ताळमेळ करण्यासाठी जीएसटी-ग्रास या नावाने स्वतंत्र प्रणाली विकसित केली आहे. त्यानुसार राज्य वस्तू व सेवा कराच्या (SGST) रकमांचे लेखांकन व ताळमेळ जीएसटी ग्रास या प्रणालीमार्फत करण्यात येत आहे. यासाठी केंद्र शासनाच्या Goods & Service Tax Network (GSTN) व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या e-Kuber या दोन प्रणालींचे Integration करण्यात आले आहे. माहे जुलै २०१७ पासून राज्य वस्तू व सेवा कराच्या (SGST) रकमांचा लेखा व्हर्च्युअल ट्रेझरीमार्फत महालेखापाल, मुंबई कार्यालयास सादर केला जातो. भारतीय रिझर्व्ह बँकेत ऑनलाईन MOE (Memorandum Of Error ) सादर करण्यासाठी व त्यांचे Resolution करण्यासाठी MOE Module चा विकास पूर्ण झालेला असून RBI च्या ई-कुबेर प्रणालीशी चाचणी पूर्ण झाल्यानंतर सदर Module live केले जाईल.

# प्रकरण क्रमांक ४

# राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांच्या मासिक निवृत्तीवेतनाचे प्रदान

निवृत्तीवेतनवाहिनी ही महाराष्ट्र राज्याच्या जिल्हा कोषागारांतून निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकांच्या मासिक निवृत्तीवेतन देयकांच्या तसेच निवृत्तीवेतन प्रकरणांच्या कार्यवाही संबंधातील केंद्रीय वेब बेस्ड आज्ञावली आहे. या प्रणालीची मुख्य कार्ये पुढीलप्रमाणे:

१) कोषागारांतील निवृत्तीवेतनधारकांची ओळख आणि निवृत्तीवेतनाच्या प्रथम प्रदानासाठी आवश्यक असलेली निवृत्तीवेतनधारकांची माहिती (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकृत मुल्य आणि मृत्यु-नि-सेवा उपदान यासह) ऑनलाईन पद्धतीने महालेखापाल कार्यालयाकडुन कोषागारास प्राप्त होते.

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.८३/कोषा प्रशा-५, दिनांक ३०.१२.२०१५ अन्वये निवृत्तीवेतनधारकांना ओळख तपासणीसाठी कोषागारात हजर राहण्याची आवश्यकता नाही. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी ओळख पडताळणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने कोषागारास निवृत्तीवेतन प्रणालीमार्फत सादर करावयाची आहेत. त्या कागदपत्रांच्या आधारे निवृत्तीवेतनधारकाची ओळख पडताळणी केली जाते.

३) निवृत्तीवेतन प्रणालीत निवृत्तीवेतनधारकांच्या प्रदानाबाबतचे, बदलांचे विवरणपत्र तयार होते व त्या अनुषंगाने मासिक निवृत्तीवेतन देयके प्रणालीत तयार होतात.

४) प्रत्येक वर्षी नोव्हेंबर महिन्यात हयातीचे दाखले जमा केले जातात व त्या आधारे प्रणालीमध्ये हयातीचे दाखले प्राप्त झाल्याबाबतची नोंद घेण्यात येते.

५) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०१५/प्र.क्र.२४/कोषा प्रशा-५, दिनांक ०१.१२.२०१५ अन्वये हयातीचे दाखले (Digital Life Certificate) ऑनलाईन पद्धतीने जीवन प्रमाण प्रणालीमार्फत स्विकारले जातात.

६) Digital Life Certificate सुविधा ही हयातीचे दाखले सादर करण्यासाठी अतिरिक्त सुविधा आहे.

७) निवृत्तीवेतन प्रणालीत निवृत्तीवेतन प्रदान आदेशांचे कोषागारांतर्गत/महालेखापाल कार्यालयांतर्गत हस्तांतरण केले जाते.

८) निवृत्तीवेतन प्रणालीत निवृत्तीवेतनसंबंधीची सर्व देयके विहित नमुन्यात तयार होतात व त्या अनुषंगाने सदर देयकांचे प्रदान थेट निवृत्तीवेतनधारकांच्या खात्यात जमा करण्यात येते.

९) निवृत्तीवेतनधारकांना स्वत:च्या प्रदानाबाबतची माहिती पाहण्याकरीता निवृत्तीवेतन प्रणालीत "Pensioners Corner"ही सुविधा उपलब्ध आहे.

१०) निवृत्तीवेतन प्रणालीमार्फत सेवार्थ, बीम्स, एसबीआय सीएमपी पोर्टल, जीवन प्रमाण पोर्टल, अर्थवाहिनी, महालेखापाल कार्यालयाची प्रणाली इ. बाह्य प्रणालींशी संवाद साधता येतो.

११) जे निवृत्तीवेतनधारक आयकर कपातीस पात्र आहेत अशा निवृत्तीवेतनधारकांची यादी प्रणालीतुन उपलब्ध करुन देण्यात येते. सध्या निवृत्तीवेतनधारकांना / कुटूंबनिवृत्तीवेतनधारकांना कोषागारांमार्फत त्यांनी सादर केलेल्या बचतीच्या माहितीच्या आधारे आयकर कपात करुन फॉर्म क्र. १६ उपलब्ध करुन देण्यात येतो.

१२) शासन निर्णय, वित्त विभाग दि.२४.०८.२०२३ अन्वये महालेखापाल (ले व अ) १ महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि सर्व १५ जिल्हा कोषागार कार्यालयांसाठी ePPO, eGPO, eCPO प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

निवृत्तीवेतन प्रणालीमध्ये माहिती पाहण्याकरीता महालेखापाल कार्यालयातील अधिकाऱ्यांना लॉगीन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. महालेखापाल कार्यालयाचे अधिकारी प्रथम प्रदानाशी संबंधित असलेले तसेच इतर निवृत्तीवेतन संबंधीची मंजुर झालेली देयकांची पाहणी करु शकतात.

शासकीय कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन प्रकरणे शासन निर्णय क्र. सेनिवे-२०१४/सीआर३६/सेवा-४, दिनांक ०२.०७.२०१५ अन्वये ऑनलाईन पद्धतीनेच तयार करण्याची सुविधा सेवार्थ प्रणालीमार्फत वेतन देयके कोषागारास सादर करणाऱ्या सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकरणे ऑनलाईन पद्धतीने महालेखापाल कार्यालयास सादर केली जातात.

## तक्ता क्रमांक ९

राज्य शासनाचे निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांची वर्ष निहाय संख्या व त्यांचे निवृत्तीवेतन प्रदानावर झालेला खर्च -

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | तपशील | सन २०२२-२३ | | सन २०२३-२०२४ (मार्च-ऑक्टोबर २०२३) | | सन २०२४-२०२५ (अंदाजित) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| १ | शासकीय निवृत्तीवेतन धारक | ४६७९७८ | १६२३३.८२ | ४७३२५८ | ११२२१.८६ | ४८५०८९ | १८३५१.०६ |
| २ | कुटुंब निवृत्तीवेतन धारक | २३०२८९ | ४८०६.७६ | २३१९५६ | ३३२०.३२ | २३७७५५ | ५४७८.५४ |
| | **एकूण** | ६९८२६७ | २१०४०.५८ | ७०५२१४ | १४४४२.१८ | ७२२८४४ | २३८२९ .६० |

**टिप :** सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता उपलब्ध करुन दिलेली आकडीवारी ही पहिल्या ८ महिन्यांकरीताची आहे.

## तक्ता क्रमांक १०

इतर राज्यांचे, रेल्वे व संरक्षण विभागातील आणि अखिल भारतीय सेवेतील तसेच, राजकीय निवृत्तीवेतन धारकव कुटुंब निवृत्तीवेतन धारक  यांची वर्षनिहाय संख्या व त्यांचे निवृत्तीवेतन प्रदानावर झालेला खर्च :

(रुपये कोटीत)

| अ. क्र | तपशील | सन २०२२-२०२३ | | सन २०२३-२०२४ (मार्च-ऑक्टोबर २०२३) | | सन २०२४-२०२५ (अंदाजित) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| १ | इतर निवृत्तीवेतन धारक (कुटुंब निवृत्तीवेतन धारकांसहित) | १६१३५८ | ६९८१.९२ | १६४७८७ | ४७६९.२१ | १६८९०७ | ७८६९.२० |

**टिप :**सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता उपलब्ध करुन दिलेली आकडीवारी ही पहिल्या ८ महिन्यांकरीताची आहे.

# प्रकरण क्रमांक ५
# राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना
# राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय, मुंबई.

१. **परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना** (Defined Contribution Pension System - DCPS) :

शासन अधिसुचना, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, दिनांक २२/१२/२००३ अन्वये केंद्र शासनाने त्यांच्या सेवेमध्ये दिनांक ०१/०१/२००४ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या/ कर्मचा-यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना ( Defined Contribution Pension System) लागू करण्यात आली. तसेच, या अनुषंगाने अंमलबजावणी करण्याकरिता निवृत्तीवेतन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण (Pension Fund Regulatory and Development Authority) यांची स्थापना करण्यात आली.

केंद्र शासनाच्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य शासन सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी अथवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचा-यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली. सदर परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) योग्य त्या फेरफारासह कृषी विद्यापीठे/कृषीतर विद्यापीठे, संलग्न अशासकीय महाविद्यालये, मान्यताप्राप्त अनुदानित शासकीय संस्था (ज्यांना निवृत्तीवेतन योजना व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी लागू आहे) तसेच जिल्हा परिषद कर्मचारी यांना दिनांक ०१/११/२००५ पासून लागू करण्यात आली. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा-४, दिनांक ०७/०७/२००७ अन्वये निश्चित करण्यात आली. त्यानुसार या निधीचे लेखे ठेवणे, वार्षिक विवरणपत्र देणे इत्यादी अनुषंगिक कामांसाठी संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय निर्माण करण्यात आले.

या योजनेच्या अनुषंगाने कर्मचा-यांचे वेतनातून मूळ वेतन + महागाई वेतन (असल्यास) + महागाई भत्ता या रकमांच्या १०% रक्कम वर्गणी म्हणून दरमहा कपात करण्यात येते आणि राज्य शासन सध्या १४% रकमेचे अंशदान त्यांच्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन खात्यात जमा करते. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१६/प्र.क्र.१००/सेवा-४, दिनांक १५/०२/२०१८ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतील जमा रकमेवर तसेच, सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची स्तर-२ मध्ये जमा करण्यात आलेल्या रकमेवर भविष्य निर्वाह निधीच्या रकमेकरिता जाहीर केलेल्या व्याज दरानुसारच व्याज देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

२.	**राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली** (National Pension System - NPS) :

केंद्र शासनाने परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना ही राष्ट्रीय निवृतीवेतन प्रणालीमध्ये रुपांतरीत केली. त्यानुसार राज्य शासनाने शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अंनियो २०१२/प्र.क्र.९६/ सेवा-४, दिनांक २७/०८/२०१४ अन्वये केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना प्रणालीमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासन, जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानीत शैक्षणिक संस्था, कृषी/कृषीतर विद्यापिठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त अशासकीय महाविद्यालये, जलसंपदा विभागांतर्गत येणारी महामंडळे यांच्या सेवेतील ज्या कर्मचा-यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे व दिनांक ०१/०४/२०१५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचा-यांसाठी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू होईल. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना दिनांक ०१/०४/२०१५ पासून अंमलात आली.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना प्रणालीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने निवृत्तीवेतन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण (PFRDA), नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना विश्वस्त मंडळ (NPS Trust), केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA) मे.एन.एस.डी.एल ई-गव्हर्नन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (National Securities Depository Limited e-Governance infrastructure Limited) सद्याचे प्रोटीन ई- गव्हर्नमेंट टेक्नोलॉजीज् लिमिटेड (Protean e-Gov Technologies Limited) यांच्याशी दिनांक १०/१०/२०१४ रोजी शासनाने स्वतंत्ररित्या करार केले आहेत. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१५/NPS/प्र.क्र.३२/सेवा-४,दिनांक ०६/०४/२०१५ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आली. त्यानुसार राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाची राज्य समन्वय कार्यालय (State Nodal Office) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांचे अंशदान म्हणजे त्यांचे मूळ वेतन+महागाई वेतन (असल्यास)+महागाई भत्ता याच्या १०% आणि तेवढेच नियोक्त्याचे अंशदान कर्मचा-याच्या वेतन देयकात आहरीत करण्यात येते.तथापि, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१९/प्र.क्र.२६६/सेवा-४, दिनांक २०/०८/२०१९ अन्वये दिनांक ०१/०४/२०१९ पासून नियोक्त्याचे अंशदान हे १४% एवढे करण्यात आले आहे. वेतनातून आहरीत करण्यात आलेले कर्मचाऱ्यांचे अंशदान व शासनाचे अंशदान हे कोषागारा मार्फत ताळमेळा अंती विश्वस्त बँकेकडे (Trustee Bank) गुंतवणूकीसाठी दरमहा वर्ग करण्यात येते.

त्यानुरुप राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत लेखे एनएसडीएल ई-गव्हर्नन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड(NSDL eGovernance Infrastructure Limited) सद्याचे प्रोटीन ई-गव्हर्नमेंट टेक्नोलॉजीज्

लिमिटेड (Protean eGov Technologies Limited) हे जतन करतात. मे.एनएसडीएल ई-गव्हर्नन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड सद्याचे "प्रोटीन ई गव्हर्नमेंट टेक्नोलॉजीज् लिमिटेड" (Protean eGov Technologies Limited) हे दरवर्षी वर्गणीदाराला वार्षिक लेखा विवरणपत्र पाठवितात. सद्य:स्थितीमध्ये कर्मचाऱ्याचा राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गतचा संचित निधी गुंतविण्याकरिता निवृत्तीवेतन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण, नवी दिल्ली (PFRDA) यांनी पुढीलप्रमाणे निधी व्यवस्थापकांची नियुक्ती केली आहे.

| अनु.क्र. | Pension Fund Manager |
|---|---|
| १ | SBI Pension Fund Private Ltd |
| २ | UTI Retirement Solution Limited |
| ३ | LIC Pension Fund |

वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अंनियो २०२० प्र.क्र.७/सेवा-४, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ अन्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना स्तर-१ मध्ये जमा असलेल्या अंशदानाची रक्कम गुंतवणूकीसाठी यापुढे कोणत्याही एका निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकांची निवड करण्याचा विकल्प राहिल. यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकाच्या निवडीचा विकल्प उपलब्ध राहील. सभासद वर्षातून एकदा आपला विकल्प बदलू शकतात. तथापि, सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकांची सध्याची योजना विद्यमान व नवीन सभासदांसाठी स्वयंचलितपणे (Default) उपलब्ध राहील.

**३. केंद्र सरकार अंतर्गत विविध प्राधिकरण व त्यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत:**

**अ) निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण, नवी दिल्ली (PFRDA) :**

- निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण अधिनियम, २०१३ अन्वये विशद करण्यात आलेली कर्तव्ये.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी, संनियंत्रण व निधी व्यवस्थापन.
- योजनेच्या अंमलबजावणीचे शिक्षण व प्रशिक्षणाची कार्यपद्धती ठरविणे.
- वर्गणीदारांच्या निधीची गुंतवणूकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे, निधी व्यवस्थापकांच्या कार्यपद्धतीवर नियंत्रण ठेवणे.
- वर्गणीदारांच्या तक्रारींचे निराकरण करणे.

ब) केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण :

- नोंदणी आणि कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक देणे (Permanant Retirement Account Number-PRAN)
- वर्गणीदारास आय-पीन/टी-पीन देणे.
- वर्गणीदारांचे अंशदानाचे लेखे परिरक्षित करणे.
- वर्गणीदारांच्या माहितीमध्ये झालेले बदल अद्ययावत करणे.
- वर्गणीदारास वार्षिक अंशदान व त्यावर मिळालेल्या लाभांश यांचे विवरणपत्र निर्गमित करणे.
- कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे.

## ४. राज्य सरकार अंतर्गत विविध प्राधिकरण व त्यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत:

वित्त विभाग, शासन निर्णय अंनियो-२०१५/एनपीएस/प्र.क्र.३२/सेवा ४, दिनांक ०६/०४/२०१५ अन्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असुन, त्यानुरुप विविध स्तरावरील प्राधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत:

अ) राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय:

- राज्य समन्वय कार्यालय म्हणुन कामकाज करतील
- केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण व कोषागार कार्यालये यांच्या कार्यपद्धतीवर नियंत्रण.
- कोषागार अधिकारी तथा उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी यांचेकडे जमा झालेली कर्मचाऱ्यांचे अंशदाने विश्वस्त बँकेकडे वेळेत पाठविली जात आहे किंवा नाही यावर नियंत्रण ठेवणे.
- कर्मचाऱ्यांचे अंशदान जमा होण्याबाबत, गहाळ अंशदानाबाबत, प्रान किट इत्यादींबाबत आहरण व संवितरण अधिकारी/कोषागार अधिकारी यांच्याबाबत काही तक्रारी असल्यास त्या तक्रारींचे निराकरणबाबत पाठपुरावा करणे.
- कोषागार अधिकारी यांचेकडुन प्राप्त अहवालानुसार केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणास शासनाने केलेल्या करारनाम्याप्रमाणे सेवाशुल्क देणे.
- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत दिनांक ३१/०३/२०१५ पुर्वीचे परतावा प्रकरणास मान्यता देणे.
- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-२ मधील कोषागार स्तरावर जमा असलेल्या रकमांबाबत कोषागारांच्या माहिती अन्वये व्याजाची रक्कम प्रदान करणे.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या कार्यान्वयनाच्या अनुषंगाने प्रणाली विकसन करणे, डेटाबेस ठेवणे व कोषागारांना प्रशिक्षण देणे, इत्यादी.

ब) **कोषागार अधिकारी यांची जबाबदारी:**

- त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकारी यांची नोंदणी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडे झाल्याची खातरजमा करणे.
- दिनांक ०१/११/२००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक मिळाल्याबाबत खात्री करणे. या संदर्भात प्राप्त झालेले नोंदणी अर्ज केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडे पाठविणे, नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे.
- वेतन देयकाव्दारे तथा चलनाव्दारे शासकीय लेख्यात जमा झालेली वर्गणीदारांच्या अंशदानाच्या रकमेच्या ताळमेळ घेऊन विश्वस्त बँकेकडे विहित कालमर्यादेत पाठविणे.
- वर्गणीदारांचे योजनेच्या अनुषंगाने असलेल्या अडचणींचे निराकरण करणे, परताव्या प्रकरणासंदर्भात कार्यवाही करणे, वर्गणीदारांच्या माहितीतील होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.
- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अनुषंगाने गहाळ रकमांबाबत कार्यवाही करणे, परतावा प्रकरणांबाबत कार्यवाही करणे, कर्मचाऱ्यांच्या खात्यावर चुकीने जमा झालेल्या रकमांची केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडून रकमा परत मागविणे, योजनेअंतर्गत जमा झालेल्या रकमांचा ताळमेळ घेणे.

क) **आहरण व संवितरण अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या :**

- दिनांक ०१/११/२००५ नंतर शासकीय सेवेत नियमित पदावरील वेतन श्रेणीत शासनातील सक्षम प्राधिकाऱ्याने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या अनुषंगाने नोंदणी वेळेत पुर्ण करणे, केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडुन प्राप्त झालेली प्रान किट, आय-पीन, टी-पीन सभासदास देणे, प्रान क्रमांकाची सेवापुस्तकात नोंद घेणे.
- कर्मचाऱ्यांचे अंशदान व नियोक्त्याचे अंशदान वेतन देयकाव्दारे आहरण करणे. सदर रकमांचा ताळमेळ घेणे.
- वर्गणीदारांच्या माहितीत होणारे बदल, परताव्या संदर्भातील मागण्या व तक्रारींबाबत कोषागार अधिकारी यांचेकडे संपर्क साधणे व निराकरण करणे.

# तक्ता क्रमांक ११

## राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत NSDL कडे वर्ग करण्यात आलेल्या अंशदानाचा रक्कमांचा तपशील

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | सभासदांचे अंशदान (रू.) | नियोक्त्याचे अंशदान (रू.) | एकुण अंशदानाची रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१३-१४ | १७,२१,१७४ | १७,२१,१७४ | ३४,४२,३४८ |
| २ | २०१४-१५ | १,०२,३८,६३७ | १,०२,३८,६३७ | २,०४,७७,२७४ |
| ३ | २०१५-१६ | २०६१,०३,८०,३२२ | २०६१,०३,८०,३२२ | ४१२२,०७,६०,६४४ |
| ४ | २०१६-१७ | ८७१,९०,२५,४६३ | ८७१,९०,२५,४६३ | १७४३,८०,५०,९२६ |
| ५ | २०१७-१८ | १०७९,६५,०८,७४९ | १०७९,६५,०६,४०७ | २१५९,३०,१५,१५६ |
| ६ | २०१८-१९ | ९४४,२१,०८,७२३ | ९४४,२१,०८,७२३ | १८८८,४२,१७,४४६ |
| ७ | २०१९-२० | १४८४,९८,३७,००९ | १८१९,०१,२७,७९२ | ३३०३,९९,६४,८०१ |
| ८ | २०२०-२१ | १३५७,१८,४२,५४२ | १८७९,७०,३९,९८० | ३२३६,८८,८२,५२२ |
| ९ | २०२१-२२ | १६०२,४७,४५,२१३ | २२१३,३७,०७,९४२ | ३८,१५,८४,५३,१५५ |
| १० | २०२२-२३ | १८,३६,६०,१६,२५७ | २५,६०,९४,०३,७५४ | ४३,९७,५४,२०,०११ |
| ११ | २०२३-२४ (ऑगस्ट २०२३ पर्यंत) | ८,०३,५५,४२,८४० | ११,२२,६२,१५,३७१ | १९,२६,१७,५८,२११ |
| | **एकुण** | **१२०,४२,७९,६६,९२९** | **१४५,५३,६४,७५,५६५** | **२६५,९६,४४,४२,४९४** |

# तक्ता क्रमांक १२

## राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालय, मुंबई करीता अर्थसंकल्पीय तरतुद

( रुपये लाखांत )

| अ.क्र | कार्यक्रम | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | अर्थसंकल्प २०२३-२०२४ | सुधारित अंदाज २०२३-२०२४ | अर्थसंकल्प २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | (अ) कार्यांचे वर्गीकरण. | | | | |
| | गौणशीर्ष ०९९ (००) (०१) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (अनिवार्य) | | | | |
| | भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | दत्तमत | ६८७.३० | ८६६.१४ | ८६५.३२ | ८९१.८९ |
| | (ब) उद्दिष्ट निहाय वर्गीकरण | | | | |
| | नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना | | | | |
| | वेतन | २२५.८४ | २२३.९३ | २२३.९३ | २४८.५६ |
| | मजुरी | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | अतिकालिक भत्ता | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | दुरध्वनी, वीज व पाणी | २.४९ | ३.०० | ३.०० | ४.०० |
| | कंत्राटी सेवा | ०.१९ | १.५० | १.५० | १.५० |
| | देशांतर्गत प्रवास खर्च | ०.२१ | १.१० | १.१० | १.१६ |
| | कार्यालयीन खर्च | ३.०२ | ५.५१ | ४.९६ | ५.५० |
| | भाडेपट्टी व कर | ३६.४७ | ३०.०० | ३०.०० | ३०.०० |
| | संगणक खर्च | ०.४५ | १.१० | ८३.०० | १.१६ |
| | पेट्रोल, तेल व वंगण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०१ |
| | व्यावसायिक सेवा | ४१८.६२ | ६००.०० | ६००.०० | ६००.०० |
| | एकूण भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण दत्तमत | ६८७.३० | ८६६.१४ | ८६५.३२ | ८९१.८९ |
| | (क) वित्त व्यवस्थेची साधने | | | | |
| | भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | दत्तमत | ६८७.३० | ८६६.१४ | ८६५.३२ | ८९१.८९ |

# प्रकरण क्रमांक ६
# राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना, १९८२

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना, १९८२ दिनांक १ मे, १९८२ पासून अस्तित्वात आली ही योजना १ मे, १९८२ रोजी शासकीय सेवेत असणाऱ्या व त्यानंतर शासकीय सेवेत येणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना सक्तीची आहे. शासकीय कर्मचाऱ्यांचा सेवेत असताना मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना विम्याचे संरक्षण देणे व कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीनंतर बचत निधीतील रक्कम देऊन त्याला मदत करणे हा हया योजनेचा उद्देश आहे.

या योजनेखाली जमा होणारी वर्गणी रु. १५ च्या पटीत वसुल केली जात होती. त्यामध्ये विमा निधीचे रु.४.५० समाविष्ट होते. परंतू शा.नि.वित्त विभाग, क्र.गवियो १०.०२/प्र.क्र.३०/शाहमी, दि.२६.०७.२००२ नुसार गट विमा योजनेच्या वर्गणीचे दर दिनांक ०१.०१.२००२ पासून सुधारित करण्यात आले. त्यानुसार या योजनेखाली जमा होणारी वर्गणी रुपये ३० च्या पटीत वसूल केली जात होती.

त्यानंतर आता शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक गवियो-१००९/प्र.क्र.५८/वर्गणी/विमा प्रशासन दि.०२.०८.२०१० नुसार गट विमा योजनेच्या वर्गणीचे दर दि.०१.०१.२०१० पासून सुधारित करण्यात आले आहेत. त्यानुसार आता रुपये ६० च्या पटीत वसुल होणाऱ्या वर्गणीत विमा निधीचे रुपये १८ व बचत निधीचे निधी रुपये ४२ समाविष्ट आहे. शा.नि.वित्त विभाग, क्र.गवियो-२०१५/प्र. क्र. ४७/विमा प्रशासन दि. ३०.०१.२०१६ नुसार गट क व ड कर्मचाऱ्यांच्या युनिट्स मध्ये तथा वर्गणी दरात वाढ करण्यात आली आहे.

गट क कर्मचाऱ्यांची वर्गणी रु. १२०/- वरून रु. ३६०/- व गट ड कर्मचाऱ्यांची रु. ६०/- वरून रु. २४०/- करण्यात आली आहे. शासकीय कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीनंतर, बचत निधीवर अनुज्ञेय असणा-या व्याजाच्या रकमेसह त्यास प्रदान केले जातात. शासकीय कर्मचा-यांच्या निरनिराळया संवर्गासाठी वर्गणीचे दर त्याव्दारे विम्याचे मिळणारे संरक्षण पुढीलप्रमाणे आहेत.

दिनांक १ जानेवारी २०१६ पासून अंमलात आणलेले वर्गणी दर

| गट | दिनांक १ जानेवारी, २०१६ व प्रतिवर्षी १ जानेवारीला नियमित शासकीय सेवेत असलेल्या कर्मचा-याकडून वसुल करावयाची वर्गणी. (एक युनिट रु. ६०/- प्रमाणे) **(रक्कम रुपये)** | प्रतिवर्षी २ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत नियमित सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांकडून वसूल करावयाचा विमा हप्ता **(रक्कम रुपये)** | शासकीय सेवेत असताना मृत्यू पावल्यास देय होणारी विम्याची रक्कम **(रक्कम रुपये)** |
|---|---|---|---|
| गट-अ | रु. ९६०/- | रु. ३२०/- | रु.९,६०,०००/- |
| गट-ब | रु. ४८०/- | रु. १६०/- | रु.४,८०,०००/- |
| गट-क | रु. ३६०/- | रु. १२०/- | रु. ३,६०,०००/- |
| गट-ड | रु. २४०/- | रु. ८०/- | रु. २,४०,०००/- |

महाराष्ट्र शासनाने दिनांक १ जानेवारी २०२१ पासून बचत निधी वरील व्याजाचा दर हा ७.१% व विमा निधी वरील व्याजाचा दर हा दिनांक १ डिसेंबर २०११ पासून ४.०% निर्धारित केला आहे.

हया योजनेमुळे होणाऱ्या जमा खर्चाच्या व्यवहाराची राज्याच्या लोकलेख्यात "८०११, विमा व निवृत्तिवेतन निधी ---१०७, इतर विमा व निवृत्तीवेतन निधी ---(१) महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना - (अ) विमा निधी , (ब) बचत निधी "हया प्रदान शीर्षाखाली नोंद घेण्यात येते.

योजनेखालील निधीत जमा होणाऱ्या रकमेच्या शिलकेवर आकारण्यात येणा-या व्याजाची रक्कम दर तिमाहीस " २०४९, व्याज प्रदाने-१०८, विमा व निवृत्तिवेतन निधी यावरील व्याज-(३) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना - (अ) विमा निधी , (ब) बचत निधी "हया लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येते व ८०११ विमा व निवृत्तीवेतन निधी महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना (अ) विमा निधी (ब) बचत निधी या बचत लेखाशिर्षाखाली योजनेच्या निधीमध्ये पुस्तकी समायोजनाव्दारे जमा करण्यात येते.

सन २०२२- २०२३ हया वित्तीय वर्षात बचत निधीमध्ये रु.२०४,०९,३९,८११/- तर विमा निधीमध्ये रु.४,७६,२७,०००/- (माहे जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ अखेरच्या व्याजाचे पुस्तकी समायोजनाची रक्कम) एवढी व्याजाची रक्कम जमा करण्यात आली आहे. सदर योजनेखाली दिनांक ३१ मार्च, २०२३ अखेर विमा निधीमध्ये रु.११६,६३,९६,४०४/- एवढा निधी शिल्लक होता. तसेच बचत निधीमध्ये रु.२९९६,८१,७३,७४५/- एवढा निधी शिल्लक होता.

सेवेत असताना मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटंबियांना प्रदान कराव्या लागणाऱ्या विम्याच्या संरक्षणाची रक्कम व बचत निधीची रक्कम तसेच सेवा निवृत्ती / सेवासमाप्ती इत्यादी कारणांमुळे योजनेचे सदस्यत्व संपुष्टात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रदान करावी लागणारी बचत निधीची रक्कम यासाठी होणारा सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाचा अंदाजित खर्च रुपये ३७,२७९ लाख एवढा आहे.या योजनेच्या संरक्षणाखाली किती कर्मचारी आले आहेत. तसेच त्यांचेकडून योजनेत जमा झालेली रक्कम व त्यांना विमा संरक्षणाव्दारे प्रदान केलेली रक्कम याबाबतची माहिती सोबतच्या तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

## तक्ता क्रमांक १३

## गट विमा योजनेच्या सदस्यास प्रदान रक्कम

(रक्कम लाखांत)

| गट | राज्य शासकीय कर्मचारी | २०२२-२३* | २०२३-२४** | २०२४-२५** |
|---|---|---|---|---|
| अ | सदस्य संख्या - बचत निधी | २३३२ | २४५७ | २७०३ |
| | बचत निधीमधून प्रदान रक्कम | ६३५१ | ६९२९ | ७६२२ |
| | सदस्य संख्या-विमा निधी | १२३ | ७९ | ८७ |
| | विमा निधीमधून प्रदान रक्कम | ११०५ | ७६० | ८३६ |
| ब | सदस्य संख्या-बचत निधी | ३५८१ | ३५४४ | ३८९८ |
| | बचत निधीमधून प्रदान रक्कम | ४८८१ | ४७८२ | ५२६० |
| | सदस्य संख्या- विमा निधी | १६५ | १५२ | १६७ |
| | विमा निधीमधून प्रदान रक्कम | ७४६ | ७२९ | ८०२ |
| क | सदस्य संख्या - बचत निधी | १२११६ | १३४४९ | १४७९४ |
| | बचत निधीमधून प्रदान रक्कम | १०६६५ | १२२८४ | १३५१२ |
| | सदस्य संख्या - विमा निधी | १४०४ | ११८६ | १३०५ |
| | विमा निधीमधून प्रदान रक्कम | ४८३९ | ४२६९ | ४६९६ |
| ड | सदस्य संख्या-बचत निधी | ५१८९ | ५५८१ | ६१३९ |
| | बचत निधीमधून प्रदान रक्कम | २४०२ | २७३० | ३००३ |
| | सदस्य संख्या- विमा निधी | ६८८ | ५८१ | ६३९ |
| | विमा निधीमधून प्रदान रक्कम | १५७८ | १३९४ | १५३३ |
| समायोजित रक्कम | बचत निधीमधून प्रदान रक्कम | १२ | १३ | १५ |
| | विमा निधीमधून प्रदान रक्कम | ० | ० | ० |
| **एकूण** | **सदस्य संख्या - बचत निधी** | **२३२१८** | **२५०३१** | **२७५३४** |
| | **बचत निधी मधून प्रदान रक्कम** | **२४३११** | **२६७३८** | **२९४१२** |
| | **सदस्य संख्या - विमा निधी** | **२३८०** | **१९९८** | **२१९८** |
| | **विमा निधी मधून प्रदान रक्कम** | **८२६८** | **७१५२** | **७८६७** |

* प्रत्यक्ष सरासरी सदस्य संख्या व त्यांची खर्चाची रक्कम लाखांत

** अंदाजित सरासरी सदस्य संख्या व त्यांची अंदाजित खर्चाची रक्कम लाखांत

# प्रकरण क्रमांक ७
# वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमा छत्र योजना

कार्यरत व सेवानिवृत राज्य शासकीय अधिकारी /कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचे करिता शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४० /२०१४/कोषा-प्रशा-४ दिनांक -९ जुलै २०१४ अन्वये वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना सुरु करण्यात आली.

वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र (गट) योजना ही गट विमा तत्वावर आहे. ही योजना सुरु करण्याचा उद्देश असा आहे की, शासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची सोय उपलब्ध आहे. तथापि सेवानिवृत्त झाल्यानंतर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची सोय एकदम नाहीशी होते व बहुतांश सेवा निवृतांकडे वैद्यकीय विमा संरक्षण नसते. उतारवयात वैद्यकीय सेवेची गरज जास्त असताना निवृत्तीवेतनाच्या मर्यादित स्त्रोतामधून आजारपणावरील उपचाराचा खर्च भागविणे अनेक कर्मचाऱ्यांसाठी अडचणीचे ठरते. तसेच विमा कंपनी या वयात नव्याने वैद्यकीय विमा पॉलीसी देत नाही किंवा पॉलीसीसाठी वैद्यकीय चाचणी आवश्यक असते व अस्तित्वातील आजारांना विमा संरक्षण मिळत नाही.

या सर्व बाबींचा विचार करत शासनावर कुठलाही वित्तीय भार न येता निवृत्ती जवळ आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी विमा योजना सुरु करण्यात आली आहे.कार्यरत अधिकारी / कर्मचारी देखील सदर योजनेचा लाभ घेऊ शकतात.वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना The New India Assurance Co. Ltd यांचेमार्फत राबविण्यात येत आहे. सदर कंपनीव्दारे वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या विमाछत्र योजनेत सहभागी होणाऱ्या अधिकारी /कर्मचारी सदस्यांना वैद्यकीय चाचणीची गरज राहत नाही व कर्मचाऱ्यांना असलेल्या आजारपणापासून संरक्षण मिळते.

सदर योजना सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व गट अ, ब, क व ड अधिकारी/कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना सक्तीची राहील, असे योजनेचे सुरुवातीचे स्वरूप होते. वैद्यकीय दाव्यांच्या अनुभवानुरुप व योजनेच्या आढाव्यानुसार सदर योजनेचे नूतनीकरण करीत असताना योजनेची व्याप्ती वाढविण्याकरिता त्यामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले आहेत.

सन २०२३-२४ च्या "विमाछत्र योजनेचे" नूतनीकरण करण्यासंदर्भातील वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०२३ अन्वये निर्गमीत करण्यात आला आहे. या वर्षी या योजनेची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टिने "दि न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनीने" कार्यरत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे पती/पत्नी, २५ वर्षे वयाच्या मर्यादेतील दोन अपत्ये यांचा समावेश करुन कुटूंबाच्या आकारमानानुसार (कर्मचाऱ्याच्या वयोगट निहाय १८-३५ वर्षे, ३६-४५ वर्षे, ४६-५८ वर्षे) तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचेकरिता प्रिमीयम आकारणी केली आहे. सदर योजना सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकारी

यांना सक्तीची राहणार नसून स्वेच्छेने आवश्यक तो वार्षिक हप्ता भरून सबंधित अधिकारी/कर्मचारी या योजनेमध्ये सहभागी होऊ शकेल.

शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि. २४ जुलै, २०२३ अनुसार सर्व अधिकारी /कर्मचारी ( अ ,ब ,क व ड ) व अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना विम्याचा वार्षिक हप्ता पुढीलप्रमाणे राहील.

कार्यरत व सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचेकरिता वैद्यकीय प्रतीपूर्तीच्या विमाछत्र योजनेचे नुतनीकरणाचे वार्षिक हप्ते प्रतिवर्षी शासनाद्वारे निर्धारित करण्यात येतात.

- जुलै २०२३ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत विमा छत्र योजनेत सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ४७८४ अशी आहे. तर यामध्ये १९ नवीन सदस्य असून मागील वर्षी विमाछत्र योजनेत सहभागी झालेल्या ५४९५ कर्मचाऱ्यांपैकी ४७६५ कर्मचाऱ्यांनी योजनेचे नूतनीकरण करुन घेतले आहे.
- The New India Assurance Co. Ltd. कडून प्राप्त माहितीनुसार सन २०२३-२४ या वर्षाकरिता ४७८४ कर्मचाऱ्यांचे रु.२०,७८,३२,६८४/- विमा हप्त्याची रक्कम जमा झाली आहे.
- TPA (MDIndia) कडून प्राप्त माहितीनुसार सन २०२३-२४ या वर्षाकरिता माहे नोव्हेंबर २०२३ पर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती दाव्यांची संख्या ६२९ आहे तर प्रतिपूर्ती दाव्यांची रक्कम रु.३,२७,९६,३११/- इतकी आहे.

# प्रकरण क्रमांक ८
# संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे प्रशिक्षण व परीक्षा विषयक कार्यक्रम

राज्य शासनाच्या प्रशिक्षण धोरणानुसार सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून प्रशासन गतिमान होण्यासाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. प्रशिक्षण धोरणाच्या मध्यवर्ती कल्पनेत सर्वांसाठी प्रशिक्षण, निरंतर प्रशिक्षण आणि गरजांवर आधारित प्रशिक्षण या बाबी समाविष्ट आहेत.

संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्त्याखालील महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील अधिकारी तसेच कर्मचारी यांना शासनाच्या विविध कार्यालयांमध्ये वेगवेगळया स्तरावर काम करावे लागते. त्यामुळे अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या लेखा विषयक गरजा लक्षात घेवून राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात.

## महाराष्ट्र वित्त व लेखा प्रशिक्षण केंद्र

महाराष्ट्र शासन, वित्तविभाग शासन निर्णय दि.२९ नोव्हेंबर २००९ अन्वये संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्त्याखालील प्रशिक्षण केंद्रामध्ये घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लेखा लिपीक प्रशिक्षण व पर्यवेक्षकीय प्रशिक्षण कार्यक्रमांबाबत सूचना निर्गमीत केलेल्या आहेत.

संचालनालयाच्या अधिपत्त्याखालील प्रशिक्षण केंद्राला महाराष्ट्र वित्त व लेखा प्रशिक्षण केंद्र (Maharashtra Finance and Accounts Training Centre) असे संबोधले जाते. संचालक, लेखा व कोषागारे हे या केंद्रांचे नियंत्रक अधिकारी आहेत.

प्रशिक्षण केंद्रामध्ये मोडयूल निहाय प्रशिक्षण पध्दत स्वीकारण्यात आली आहे. त्यामध्ये ५० दिवसांचे पर्यवेक्षकीय प्रशिक्षण, अल्प कालावधीचे २ ते ५ दिवसांचे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येतात. सदर प्रशिक्षण केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या व्याख्यांनापैकी ५०% व्याख्याने घेण्यासाठी संबंधित विषयातील तज्ञ व्यक्तींना अभ्यागत व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात येते.

## तक्ता क्रमांक १४
## प्रशिक्षण केंद्रांचा तपशील

| अ.क्र. | प्रशिक्षण केंद्रांचे नांव | अधिनस्त जिल्हे |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र वित्त व लेखा प्रशिक्षण केंद्र, चेंबूर, मुंबई. | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे रायगड, पालघर ,रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| २ | सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे. | सातारा,सांगली,सोलापूर, कोल्हापूर, पुणे |
| ३ | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर. | नागपूर, वर्धा, भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली, गोंदिया |
| ४ | सहसंचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद. | औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली |
| ५ | सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती. | अमरावती, अकोला, बुलढाणा,यवतमाळ, वाशीम |
| ६ | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक | नाशिक, धुळे, नंदुरबार,जळगाव, अहमदनगर |

**राज्य प्रशिक्षण धोरण :**

शासन सेवेत सर्व स्तरावर अधिकारी / कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरीता संचालनालयातील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत शासकीय कामकाजातील विषयावर आधारित आधुनिक गरजांचा व ज्ञानाचा तसेच कार्यालयात वापरण्यात येणाऱ्या संगणक प्रणालींचा विचार करुन पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण विशेषज्ञांकडून देण्यात येते. यामध्ये नवीन विषयाची तोंडओळखही तज्ञांकडून दिली जाते.

## तक्ता क्रमांक १५

### राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत महाराष्ट्र नागरी सेवा (कालबद्ध प्रशिक्षण) नियम २०२२ नुसार विहीत करण्यात आलेल्या प्रशिक्षणांचा तपशिल

| अ.क्र. | प्रशिक्षणाचा प्रकार | प्रशिक्षण कालावधी |
|---|---|---|
| १ | पायाभूत प्रशिक्षण | एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमातील समाविष्ट संवर्ग वगळून इतर विविध संवर्गातील शासकीय कर्मचारी त्याच्या नियुक्तीनंतर एक वर्ष कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करेल. |
| २ | पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण | शासकीय कर्मचारी त्याच्या पदोन्नतीनंतर एक वर्षाच्या कालावधीत पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण पूर्ण करेल. |
| ३ | उजळणी प्रशिक्षण | पायाभूत प्रशिक्षण किंवा पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षणानंतर सात वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच्या एक वर्ष कालावधीत शासकीय कर्मचारी त्याचे उजळणी प्रशिक्षण पूर्ण करेल. उजळणी प्रशिक्षणानंतर सात वर्ष कालावधी पूर्ण होईपर्यंत शासकीय कर्मचारी पदोन्नत न झाल्यास, त्यानंतरच्या एक वर्ष कालावधीत तो पुन्हा उजळणी प्रशिक्षण पूर्ण करेल. |
| ४ | बदलीनंतरचे प्रशिक्षण | बदलीनंतर कामाच्या स्वरूपामध्ये बदल होत असल्यास शासकीय कर्मचारी बदलीनंतरचे प्रशिक्षण पूर्ण करेल. |
| ५ | तोंड ओळख प्रशिक्षण | शासकीय धोरण किंवा अंतर्गत कार्यपद्धती किंवा अधिनियम किंवा नियम किंवा तंत्रज्ञान यामध्ये होणाऱ्या बदलांविषयी अवगत करण्याकरिता वेळोवळी आयोजित केलेले तोंडओळख प्रशिक्षण संबंधित शासकीय कर्मचारी पूर्ण करेल. |

## तक्ता क्रमांक १६

### सन २०२३-२०२४मध्ये विविध प्रशिक्षण संस्थामध्ये आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण कार्यक्रम.

| अ.क्र. | प्रशिक्षण संस्था | संवर्ग | प्रशिक्षणाचा प्रकार | | प्रशिक्षणार्थींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण | उजळणी प्रशिक्षण | |
| १ | यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे | वर्ग-१ | ४५ | ५० | ९५ |
| २ | वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती ) नागपूर | वर्ग-२ | ४४ | निरंक | ४४ |
| ३ | कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल, जिल्हा सांगली | वर्ग-२ | ५२ | ५८ | ११० |

**संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे स्तरावरुन सन २०२४-२०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षणांचा तपशिल.**

## तक्ता क्रमांक १७

गट - अ संवर्गातील विभागनिहाय मंजूर पदे व उजळणी प्रशिक्षण व पदोन्नतीनंतरच्या प्रशिक्षणासाठी पात्र अधिकाऱ्यांचा तपशिल व अंदाजित खर्च

| अ. क्र. | पदनाम | एकूण मंजूर पदे | उजळणी प्रशिक्षण (०५ दिवसांच्या) | | पदोन्नतीनंतरच्या प्रशिक्षणासाठी (१२ दिवसांच्या) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दरवर्षी पात्र होणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या | अंदाजित खर्च (रुपये) | दरवर्षी पात्र होणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या | अंदाजित खर्च(रुपये) |
| १ | संचालक | २९ | ५ | ६२,५००/- | ०८ | २,४०,०००/- |
| २ | सह संचालक | ६० | १० | १,२५,०००/- | १५ | ४,५०,०००/- |
| ३ | उप संचालक | १३८ | २३ | २,८७,५००/- | ५० | १५,००,०००/- |
| ४ | सहायक संचालक | ३२६ | ३० | ३,७५,०००/- | ६० | १८,००,०००/- |
| **एकूण** | | **५५३** | **६८** | **८,५०,०००/-** | **१३३** | **३९,९०,०००/-** |

## तक्ता क्रमांक १८

गट - ब संवर्गातील विभागनिहाय मंजूर पदे व उजळणी प्रशिक्षणासाठी (०५ दिवसांच्या) पात्र अधिकाऱ्यांचा तपशिल व अंदाजित खर्च

| अ.क्र. | विभाग | लेखा अधिकारी | | | सहायक लेखा अधिकारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण पदे | दरवर्षी प्रशिक्षणासाठी पात्र होणारी सरासरी अधिकारी संख्या | अंदाजित खर्च (रुपये) | एकूण पदे | दरवर्षी प्रशिक्षणासाठी पात्र होणारी सरासरी अधिकारी संख्या | अंदाजित खर्च (रुपये) |
| १ | अमरावती | १२२ | २० | १,५०,०००/- | १३० | २५ | १,८७,५००/- |
| २ | औरंगाबाद | १८८ | ३० | २,२५,०००/- | २०२ | ३० | २,२५,०००/- |
| ३ | नागपूर | १४८ | २५ | १,८७,५००/- | १८७ | २५ | १,८७,५००/- |
| ४ | नाशिक | १३० | २० | १,५०,०००/- | १६० | २५ | १,८७,५००/- |
| ५ | कोकण | ३१९ | ५० | ३,७५,०००/- | ४९८ | ८० | ६,००,०००/- |
| ६ | पुणे | १७६ | ३० | २,२५,०००/- | २५५ | ४० | ३,००,०००/- |
| **एकूण** | | **१०८३** | **१७५** | **१३,१२,५००/-** | **१४३२** | **२२५** | **१६,८७,५००/-** |

## तक्ता क्रमांक १९

गट - ब संवर्गातील विभागनिहाय मंजूर पदे व पदोन्नतीनंतरच्या प्रशिक्षणासाठी (१२ दिवसांच्या) पात्र अधिकाऱ्यांचा तपशिल व अंदाजित खर्च

| अ. क्र. | विभाग | लेखा अधिकारी | | | सहायक लेखा अधिकारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण पदे | दरवर्षी प्रशिक्षणासाठी पात्र होणारी सरासरी अधिकारी संख्या | अंदाजित खर्च (रुपये) | एकूण पदे | दरवर्षी प्रशिक्षणासाठी पात्र होणारी सरासरी अधिकारी संख्या | अंदाजित खर्च (रुपये) |
| १ | अमरावती | १२२ | ३० | ५,४०,०००/- | १३० | ३० | ५,४०,०००/- |
| २ | औरंगाबाद | १८८ | ५० | ९,००,०००/- | २०२ | ५० | ९,००,०००/- |
| ३ | नागपूर | १४८ | ३५ | ६,३०,०००/- | १८७ | ३५ | ६,३०,०००/- |
| ४ | नाशिक | १३० | ३० | ५,४०,०००/- | १६० | ४० | ७,२०,०००/- |
| ५ | कोकण | ३१९ | ८० | १४,४०,०००/- | ४९८ | १०० | १८,००,०००/- |
| ६ | पुणे | १७६ | ४८ | ८,१०,०००/- | २५५ | ५० | ९,००,०००/- |
| **एकूण** | | **१०८३** | **२७०** | **४८,६०,०००/-** | **१४३२** | **३०५** | **५४,९०,०००/-** |

# परीक्षा शाखा

संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या अधिपत्त्याखालील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी सेवेत कायम होणेकरिता तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नतीसाठी पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या विविध परीक्षांचे आयोजन दरवर्षी करण्यात येते.

१) महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा सेवा गट -क परीक्षा

२) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग - १ परीक्षा

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग -३ परीक्षा

उपरोक्त नमुद अ.क्र.१ मधील परीक्षा वगळता इतर सर्व परीक्षा ह्या यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित केल्या जात होत्या. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२२/०९/२०२० च्या परीपत्रकानुसार, ज्या विभागीय परीक्षांचे आयोजन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत केले जात होते, अशा सर्व परीक्षांचे आयोजन हे, सन २०२१ पासून संबंधित विभागाने करणेबाबत सूचीत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दि.२६/०२/२०२१ अन्वये उपरोक्त नमूद अ.क्र.२ च्या परीक्षांचे आयोजन हे संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या स्तरावरुन करण्यात येत आहे.

तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, दि.०६/१०/२०२२ नुसार ग्राम विकास विभागांतर्गत जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या कनिष्ठ लेखाधिकाऱ्यांसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग ३ च्या परीक्षेचे आयोजनही संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या स्तरावरुन करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर परीक्षेचे आयोजन देखील दरवर्षी करण्यात येणार आहे.

## तक्ता क्रमांक २०

### परीक्षांचे आयोजन करण्यासाठी होणाऱ्या संभाव्य खर्चाचा तपशिल.

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | खर्चाचा तपशिल | | एकूण रक्कम (अंदाजित रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट लेखा व स्थानिक निधी लेखा सेवा गट -क परीक्षा | छपाई | उत्तरपत्रिका | ३,००,०००/- |
| | | | प्रश्नपत्रिका | २,००,०००/- |
| | | मानधन | प्राश्निक | ५०,०००/- |
| | | | परीक्षक | ३,५०,०००/- |
| | | | नियमक | १,५०,०००/- |
| २ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग - १ परीक्षा | छपाई | उत्तरपत्रिका | १,५०,०००/- |
| | | | प्रश्नपत्रिका | १,००,०००/- |
| | | मानधन | प्राश्निक | ५०,०००/- |
| | | | परीक्षक | ५०,०००/- |
| | | | नियमक | २५,०००/- |
| ३ | महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्तव लेखा सेवा वर्ग -३ परीक्षा | छपाई | प्रश्नपत्रिका | १,५०,०००/- |
| | | | उत्तरपत्रिका | १,००,०००/- |
| | | मानधन | प्राश्निक | ५०,०००/- |
| | | | परीक्षक | १,००,०००/- |
| | | | नियमक | ५०,०००/- |
| | | **एकूण** | | १८,७५,०००/- |

उपरोक्त सर्व प्रशिक्षणासाठी व विविध परीक्षासाठी आयोजन करण्यासाठी होणाऱ्या संभाव्य खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशिल | एकूण रक्कम (अंदाजित रुपये) |
|---|---|---|
| १ | उजळणी प्रशिक्षण व पदोन्नतीनंतरच्या प्रशिक्षणासाठी (गट - अ) | ४८,४०,०००/- |
| २ | उजळणी प्रशिक्षणासाठी(गट -ब) | ३०,००,०००/- |
| ३ | पदोन्नतीनंतरच्या प्रशिक्षणासाठी (गट -ब) | १,०३,५०,०००/- |
| ४ | संचालनालय,लेखाव कोषागारे, मुंबई यांच्या अधिपत्त्याखालील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षासाठी | १८,७५,०००/- |
| **एकूण अंदाजित खर्च** | | २,००,६५,०००/- |

# तक्ता क्रमांक २१

## लेखा प्रशिक्षण वर्गाकरीता अर्थसंकल्पीय तरतुद

( रुपये लाखांत )

| अ.क्र. | कार्यक्रम | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | अर्थसंकल्प २०२३-२०२४ | सुधारित अंदाज २०२३-२०२४ | अर्थसंकल्प २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **(अ) कार्यांचे वर्गीकरण.** | | | | |
| | **गौणशीर्ष ००३ लेखा प्रशिक्षण वर्ग (अनिवार्य)** | | | | |
| | **भारित** | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **दत्तमत** | २८५.७२ | ३५०.५३ | ३४१.१६ | ४११.९९ |
| | **(ब) उद्दिष्ट निहाय वर्गीकरण** | | | | |
| | **लेखा प्रशिक्षण वर्ग** | | | | |
| | वेतन | २५८.८२ | ३०७.९० | ३०७.९० | ३६७.५१ |
| | मजुरी | ०.०७ | ०.०८ | ०.०८ | ०.०८ |
| | अतिकालिक भत्ता | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.८० |
| | दुरध्वनी, वीज व पाणी | ०.३५ | ०.५० | ०.५० | ०.०० |
| | कंत्राटी सेवा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | देशांतर्गत प्रवास खर्च | ०.४९ | १.९० | १.३३ | २.०० |
| | कार्यालयीन खर्च | १३.४२ | २२.०० | १३.२० | २३.१० |
| | भाडेपट्टी व कर | ०.२५ | ०.१५ | ०.१४ | ०.५० |
| | संगणक खर्च | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | पेट्रोल, तेल व वंगण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | व्यावसायिक सेवा | १२.३१ | १८.०० | १८.०० | १८.०० |
| | **एकूण भारित** | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण दत्तमत** | २८५.७२ | ३५०.५३ | ३४१.१६ | ४११.९९ |
| | **(ख) वित्त व्यवस्थेची साधने** | | | | |
| | **भारित** | **०.००** | **०.००** | **०.००** | **०.००** |
| | **दत्तमत** | **२८५.७२** | **३५०.५३** | **३४१.१६** | **४११.९९** |

# प्रकरण क्रमांक ९

# संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे अन्य कामकाज

## भांडार पडताळणी

लोकलेखा समितीने १९४४-४५ च्या विनियोजन लेख्यावरील लेखा अहवाल व केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक ९२८१/३३, दिनांक १६ ऑक्टोबर, १९५२ अन्वये वित्त विभागाचा एक भाग म्हणून स्वतंत्र भांडार पडताळणी शाखेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १ जानेवारी, १९६२ पासून स्थापना करण्यात आलेल्या लेखा व कोषागारे संचालनालयामध्ये वित्त विभागाची भांडार पडताळणी शाखा विलीन करण्यात आली. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक डीएटी-१०६४/५८४/सी-१२, दिनांक १ फेब्रुवारी, १९६५ अन्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा दिनांक १ फेब्रुवारी, १९६५ रोजी स्थापन करण्यात आली आणि भांडार पडताळणी अधिकारी व भांडार निरीक्षक या पदाचा उक्त सेवेच्या अनुक्रमे गट-ब व गट-ब (अराजपत्रित) मध्ये अंतर्भाव करण्यात आला.

भांडार पडताळणी शाखेमार्फत शासनाच्या विविध विभागीय राजपत्रित कार्यालयांच्या ताब्यातील साठ्यांची व भांडारांची पडताळणी करण्याचा प्रमुख उद्देश साठ्यांची प्रत्यक्ष शिल्लक आणि पुस्तकी शिल्लक यांचा मेळ घेणे असा आहे. त्या सोबतच प्रत्यक्ष शिल्लक साठा पुस्तकात दर्शविलेल्या भांडार वर्णनाशी जुळतो किंवा नाही हेही तपासले जाते. वस्तुच्या / साठ्याच्या वापराचे प्रमाण जास्त आहे काय तसेच दर्शविण्यात आलेली तूट योग्य व समर्थनीय आहे काय ह्याची ही पडताळणी भांडार पडताळणी शाखेतील अधिकारी / कर्मचारी करतात. साठा व भांडारे यांची खरेदी प्रक्रिया तसेच आवश्यकता ह्याबाबींची तपासणी ही या शाखेमार्फत होत असते. विशिष्ट कालावधीनंतर खराब होऊ शकणाऱ्या आणि उपयोगात नसणाऱ्या भांडाराच्या जादा साठ्याची विल्हेवाट इतर भांडाराकडे (आवश्यकता असेल तेथे) वर्ग करून लावता येईल काय याबाबत उपयुक्त सुचनाही केल्या जातात.

थोडक्यात भांडारे व वस्तुंचे साठे यांचा योग्य व परिणामकारक वापर होण्याच्या दृष्टीने भांडार पडताळणी चिकित्सक दृष्टीने करण्यात येते.

**भांडाराचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते :**

**वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०११/प्र.क्र.२१/कोषा प्र-५, दिनांक २५ मार्च, २०११.**

| | |
|---|---|
| "अ" वर्ग (मोठी भांडारे) | ज्या भांडारातील वस्तुंच्या साठ्यांची किंमत रुपये ५०,००,०००/- किंवा त्याहुन अधिक आहे अशी भांडारे |
| "ब" वर्ग (मध्यम भांडारे) | ज्या भांडारातील वस्तुंच्या साठ्यांची किंमत रुपये ५,००,०००/- किंवा त्याहून अधिक परंतु, रुपये ५०,००,०००/- पेक्षा कमी आहे अशी भांडारे. |
| "क" वर्ग (लहान भांडारे) | ज्या भांडारातील वस्तुंच्या साठ्यांची किंमत रु. १,००,०००/- पेक्षा जास्त परंतु, रुपये ५,००,०००/- हून कमी आहे अशी भांडारे. |

"अ","ब" व "क" वर्गीकरणानुसार भांडाराच्या पडताळणीसाठी कालमर्यादा पुढे दर्शविल्याप्रमाणे आहे.

| भांडाराचा प्रकार | कालावधी |
|---|---|
| "अ" वर्ग | ३ वर्षांतुन एकदा |
| "ब" वर्ग | ४ वर्षांतुन एकदा |
| "क" वर्ग | ५ वर्षांतुन एकदा |

प्रत्येक प्रकारच्या भांडाराच्या पडताळणीसाठी किती दिवस लागतील या बाबत स्पष्ट मानके नाहीत. ते भांडारातील साठ्यावर निर्भर असते. भांडाराच्या वर्गीकरणानुसार लागणाऱ्या मानवी दिवसाचे प्रमाण निश्चित स्वरुपाचे नसून, मागील वर्षामध्ये अशा भांडार पडताळणीकरीता लागलेला कालावधी लक्षात घेऊन भांडार पडताळणी पूर्ण करण्यासाठी व अहवाल तयार करण्यासाठी लागणाऱ्या कालावधीचा अंदाज तदर्थ तत्त्वावर करण्यात येतो.

सदर शाखा लेखा व कोषागारे संचालकांच्या नियंत्रणाखाली आहे. मुंबईतील भांडाराच्या भांडार पडताळणीचे काम सह/उपसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग हे पाहत असून, इतर प्रादेशिक स्तरावर प्रादेशिक सह / उप संचालकांकडून त्यासंबंधीची कामे पार पाडली जातात.

संग्रह व भांडार पडताळणीच्या कामासाठी करावयाच्या दौऱ्याचे कार्यक्रम आखणे आणि ते सर्व पार पाडणे ह्यासाठी प्रत्येक मंडळ कार्यालयातील भांडार पडताळणी अधिकारी ह्यांचेमार्फत करण्यात येते. सदर अधिकाऱ्यांचा तसेच त्यांच्या हाताखालील कर्मचा-यांचा दौऱ्याचा आगाऊ त्रैमासिक कार्यक्रम आखून तो विभागीय सह / उप संचालक, लेखा व कोषागारे यांचेकडून मान्य करून घेतला जातो.

शासकीय कार्यालयांच्या करण्यात आलेल्या भांडार पडताळणीचा अहवाल संबंधित कार्यालयास तसेच त्यांच्या प्रशासकीय विभागात भांडार पडताळणी अधिकारी पाठवित असतात.

**वार्षिक प्रशासन अहवाल** : विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या वार्षिक प्रशासन अहवालाचे एकत्रिकरण करून हा अहवाल शासनास सादर करण्यात येतो व त्याची प्रत महालेखापाल, मुंबई/नागपूर यांना पाठविण्यात येते. त्या अहवालाची प्रत सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन यांनाही पाठविण्यात येते. सदर अहवालामध्ये वर्षभरामध्ये प्रत्यक्ष पडताळणी केलेल्या भांडारांचा विभागनिहाय तपशील व आढळलेल्या गंभीर उणीवांचा तपशील अंतर्भूत करण्यात येतो.

# तक्ता क्रमांक २२

## भांडार पडताळणी बाबतची माहिती

| अ.क्र. | तपशील | २०२२-२०२३ | २०२३-२०२४** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | भांडारांचे वर्गीकरण | | |
| | भांडारांची एकूण संख्या | | |
| | “अ” वर्ग भांडारे | १७८९ | १८६६ |
| | “ब” वर्ग भांडारे | २१२८ | २१३५ |
| | “क” वर्ग भांडारे | २३१ | २३२ |
| | **एकूण** | **४१४८** | **४२३३** |
| २ | चक्रीय नियमानुसार पडताळणी योग्य झालेली भांडारे (तपासणीसाठी प्रलंबित असलेल्या भांडारांसह). | | |
| | “अ” वर्ग भांडारे | १४४८ | १२३५ |
| | “ब” वर्ग भांडारे | १३८८ | १२२५ |
| | “क” वर्ग भांडारे | १२० | १४७ |
| | **एकूण** | **२९५६** | **२६०७** |
| ३ | संग्रह पडताळकाच्या संख्येनुसार उपलब्ध असलेली मानवी दिवस व त्यांचे भांडारांच्या वर्गनिहाय वाटप. | | |
| | “अ” वर्ग भांडारे | ५५४० | ४९२२ |
| | “ब” वर्ग भांडारे | १४०७ | १६७१ |
| | “क” वर्ग भांडारे | १४८ | १५९ |
| | **एकूण** | **७०९५** | **६७५२** |
| ४ | उपलब्ध मानवी दिवसांच्या आधारे अ.क्र.२ मधील पडताळणी केलेली भांडारे. | | |
| | “अ” वर्ग भांडारे | ४४४२ | ३८३८ |
| | “ब” वर्ग भांडारे | १२०० | १२४४ |
| | “क” वर्ग भांडारे | १०६ | १४५ |
| | **एकूण** | **५७४८** | **५२२७** |
| ५ | भांडार पडताळणीत आढळलेल्या त्रुटी. | | |
| | बाबींची संख्या | २६२२ | १९२३ |
| | रक्कम (रुपये लाखांत) | ६४ | २२५ |
| ६ | भांडार पडताळणीत आढळलेले अधिक्य. | | |
| | बाबींची संख्या | १२३१ | ४९४ |
| | रक्कम (रुपये लाखांत) | १३ | १६७ |
| ७ | विनावापर भांडारात अडकलेला सरकारी निधी. | | |
| | बाबींची संख्या | ३०७३ | १२९८ |
| | रक्कम (रुपये लाखांत) | १०१२ | १४४३ |
| ८ | पडताळणीत आढळलेल्या इतर उणिवा. | | |
| | बाबींची संख्या | ६९३१ | २०५३ |
| | रक्कम (रुपये लाखांत) | ३८१ | ११४ |

** अंदाजित सरासरी संख्या

# प्रकरण क्रमांक १०
# वेतन पडताळणी पथक

राज्य शासनातील पात्र शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची शासन नियमाप्रमाणे कार्यालय प्रमुखाने केलेल्या वेतननिश्चितीची पडताळणी करण्याकरीता वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपुर १२८९/प्र.क्र.२५/सेवा१० दि.२२ डिसेंबर, १९८९ अन्वये राज्यामध्ये मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर अशी चार वेतन पडताळणी पथके सर्वप्रथम स्थापन करण्यात आली. यामध्ये नाशिक, अमरावती व कोकण (कोकण भवन) या पथकांचा नव्याने समावेश केल्याने सद्यस्थितीत राज्यात ७ वेतन पडताळणी पथके कार्यरत आहेत.

राज्य शासन पात्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दर दहा वर्षांनी वेतन आयोग लागू करत असते. सध्या शासन अधिसूचना, वित्त विभाग, वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि. ३० जानेवारी, २०१९ अन्वये सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. यापूर्वी वेतन पडताळणी पथके वेतनपडताळणी करून सेवापुस्तकात मुद्रांकन (शिक्का) करत होती.

शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.:संकीर्ण २०१९/प्र.क्र.२७/कोषा-प्रशा-४, दि.१४ मे, २०१९ अन्वये वेतन पडताळणीची कार्यवाही वेतनिका प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने करणे बंधनकारक करण्यात आले आहे. वेतनिका प्रणाली कर्मचारी, कार्यालय प्रमुख व वेतन पडताळणी पथके यांच्या सुलभ वापराकरीता विकसित करण्यात आली आहे. याद्वारे कर्मचारी व कार्यालय प्रमुखांना वेतन पडताळणीची अद्ययावत माहिती (स्टेटस) अत्यंत सोप्या व जलद गतीने प्राप्त होत असते. वेतन पडताळणी पथकाने सेवापुस्तकाची पडताळणी करून सेवापुस्तक प्रमाणित केल्यास वेतनिका प्रणालीतून वेतन पडताळणी प्रमाणपत्र जारी होते.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ नुसार सातव्या वेतन आयोगाची संबंधित कार्यालयप्रमुखांनी केलेल्या दि. ०१.०१.२०१६ रोजीच्या वेतननिश्चितीची पडताळणी करण्याचे काम सध्या करण्यात येत आहे. त्यासाठी नियमित कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची एकूण ७,६०,६३१ इतक्या सेवापुस्तकांची पडताळणी करण्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे.

# तक्ता क्रमांक २३

## सातवा वेतन आयोग नुसार वेतन पडताळणीचे उद्दिष्ट

| अ.क्र. | पडताळणी पथकाचे नाव | पडताळणी पथकाच्या सेवापुस्तकांची अंदाजित संख्या | पडताळणी झालेली एकूण प्रमाणित सेवापुस्तके | पडताळणी झालेली एकूण आक्षेपित सेवापुस्तके | पडताळणी झालेली एकूण सेवापुस्तके | पडताळणी करता आक्षेपित व इतर शिल्लक असलेली सेवापुस्तके | वेतन निश्चिती अंतिमत: प्रमाणित केलेल्या सेवापुस्तकांची संख्या | | सेवापुस्तक पडताळणी उद्दिष्ट २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ | ०१/०४/२०२३ ते ३१/१०/२०२३ | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | (४+५)=६ | (३-४)=७ | ८ | ९ | १० |
| १ | मुंबई | १२६७१९ | २६३७१ | १९२८० | ४५६५१ | १००३४८ | ७४४० | ३५४३ | ४०५३४ |
| २ | कोकण | ८४२३१ | २६८२७ | १४२१४ | ४१०४१ | ५७४०४ | ५४४३ | १८६४ | २८७०२ |
| ३ | पुणे | १४६६४१ | ४१८६० | ३०८९९ | ७२७५९ | १०४७८१ | ६८८९ | ४०३३ | ५२३९१ |
| ४ | नाशिक | ९८४२३ | ४०७५० | १६५५३ | ५७३०३ | ५७६७३ | ६८८१ | ३९६२ | २८८३७ |
| ५ | औरंगाबाद | ११५८३९ | ३५६३२ | १६२४९ | ५१८८१ | ८०२०७ | ५६८८ | ५२४८ | ४०१०४ |
| ६ | अमरावती | ७८३८० | ६१६७ | २६९६ | ८८६३ | ७२२१३ | ३९६१ | २२०६ | ३६१०७ |
| ७ | नागपूर | ११०३९८ | २९३८० | २३२६९ | ५२६४९ | ८१०१८ | ५४४६ | ३३४० | ४०५०९ |
| **एकूण** | | **७६०६३१** | **२०६९८७** | **१२३१६०** | **३३०१४७** | **५५३६४४** | **४१७४८** | **२४१९६** | **२६७१८४** |

# प्रकरण क्रमांक ११

# अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांची माहिती

बृहन्मुंबईतील सर्व शासकीय आर्थिक व्यवहाराचे प्रदान व हिशोब ठेवण्याच्या कामासाठी दिनांक ०१,एप्रिल १९५५ पासून राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली अधिदान व लेखा कार्यालयाची स्थापना करण्यात आली. केंद्रीय आर्थिक व्यवहाराचे हिशेब खातेनिहाय पद्धतीने ठेवण्याची योजना अंमलात येण्यापूर्वी म्हणजेच दिनांक ०१ ऑक्टोबर १९७६ पूर्वी बृहन्मुंबईतील केंद्रीय आर्थिक व्यवहाराचे कामकाज (प्रदान व लेखे ठेवण्याचे कामकाज) कोषागार परीक्षण पद्धतीने हे कार्यालय पाहत असे. सार्वजनिक बांधकामाव्यतिरिक्त राज्य शासनाच्या सर्व प्रदानाचे व लेखे ठेवण्याची जबाबदारी या कार्यालयावर आहे.

ज्याप्रकारे एखाद्या लेखा परीक्षण कार्यालयात पूर्व लेखा परीक्षण केले जाते, त्याच धर्तीवर व त्याच मर्यादेपर्यंत पूर्व लेखा परीक्षण करून प्रदान केले जाते. परंतु हे लेखा परीक्षणाचे काम एक विभागीय योजना म्हणून केले जाते. तथापि, हे लेखा परीक्षण संवैधानिक नाही. रिझर्व्ह बँकेने पाठविलेले लेखे आणि या कार्यालयाचे प्रदान केलेल्याचे लेखे एकत्रित संकलित करून महालेखापाल, मुंबई यांना दरमहा सादर केले जातात.

१.१ बृहन्मुंबईतील राज्य व केंद्र शासनाच्या वित्तीय व्यवहाराच्या स्वरूपानुसार या कार्यालयाच्या वेगवेगळ्या शाखा करण्यात आल्या आहेत.

**१.२ लेखा परीक्षण**: ही शाखा मा. राज्यपाल यांची वेतन देयके पारित करणे, मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा, राज्यमंत्री, विद्यमान मा.विधानसभा व मा.विधान परिषद सदस्य, मा.विरोधी पक्ष नेते, मा.न्यायमूर्ती (उच्च न्यायालय), मा. अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष (विधानसभा), मा. सभापती व मा.उपसभापती (विधान परिषद), मा.लोकायुक्त आणि मा.उप लोकायुक्त यांची वेतन देयके, प्रवासभत्ता देयके व वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीची देयके पारित करणे तसेच माजी आमदार विधानसभा व विधान परिषद यांची प्रवासभत्ता देयके व वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके पारित करण्याचे काम पाहते.

त्याच प्रमाणे मा. न्यायमूर्ती (उच्च न्यायालय), मा. लोकायुक्त, मा. उपलोकायुक्त यांचा रजा लेखा ठेवणे, आयकर फॉर्म १६ तयार करणे तसेच वेतन प्राधिकारपत्रे तयार करण्याचे काम या शाखेमध्ये केले जाते. तसेच बृहन्मुंबई राज्य शासनाच्या कार्यालयातील राजपत्रित व अराजपत्रित अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते इत्यादी, त्याचप्रमाणे आकस्मिक खर्च, अनुदान, परतावा, ठेवी व कर्जे आणि महालेखापाल, मुंबई यांनी प्राधिकृत केलेली देयके यांचे लेखापरीक्षण करून प्रदान करण्याचे कामकाज चालते.

**१.३ राज्य लेखा:** राज्य शासनाचे लेखे संकलित करून महालेखापाल, मुंबई यांनापाठविण्याचेकाम केले जाते. त्याचप्रमाणे ही शाखा केंद्रीय वित्त व्यवहाराचे (निवृत्तीवेतन) लेखे ठेवण्याचे काम पाहते. वरील कामाव्यतिरिक्त जमेची खातरजमा करण्याचे, जमा रकमेचे दाखले देण्याचे, सार्वजनिक बांधकाम खात्याला संकलित कोषागार जमेचा दाखला देण्याचे कामकाज या शाखेत चालते.त्याशिवाय मुख्य लेखाशीर्ष ८००९ आणि ८६५८ चे मूळ व्हाउचर गोळा करून महालेखापाल कार्यालयात पाठवले जातात. तसेच मुख्य लेखाशीर्ष ८३३६ च्या जमा खर्चाची माहिती गोळा करून ब्रॉडशिट तयार केल्या जातात.

**१.४ प्रदानोत्तर लेखा परीक्षण शाखा:** या शाखेत रु.२५०००/- च्या आतील प्रवासभत्ता व आकस्मिक खर्चाच्या देयकाचे उत्तर लेखा परीक्षण करणे, त्यात आढळलेल्या त्रुटी संबंधित कार्यालयास कळवून त्याची पूर्तता करून घेण्याचे काम चालते.

**१.५ बृहतपत्र शाखा:** या शाखेत लेखाशीर्ष ६००३ ते लेखाशीर्ष ७६१० (सर्व ऋण शिर्षाची) मधील कर्जाची बृहतपत्र ठेवण्यात येतात. मुख्य लेखाशीर्ष ४४०८ अन्न साठवण व वखार साठवण यावरील भांडवली खर्च या लेखाशिर्षाखाली वैयक्तिक लेख्यांचे लेखांकन करण्यात येते. तसेच नवी दिल्ली येथील महाराष्ट्र शासनाचे निवासी आयुक्त महाराष्ट्र सदन, महाराष्ट्र परिचय केंद्र, निवासी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, कृष्णा गोदावरी युनिट या कार्यालयाचे कार्यालयीन जमा खर्चाचे लेखांकन करण्यात येत आहे.

**१.६ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एन.पी.एस.):** ही एक स्वतंत्र शाखा असून या शाखेत दि.०१.११.२००५ रोजी व नंतर नियुक्ती केलेल्या राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे (पूर्वीचे नाव अंशदायी निवृत्तीवेतन योजना) लेखे ठेवण्याचे काम पार पाडते.

**१.७.निवृत्तीवेतन शाखा:** या शाखेत केंद्र शासनाच्या आणि महाराष्ट्र व इतर राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन देण्याचे कामकाज चालते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ मधील कलम ३ नुसार मासिक निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतन ही सेवा अधिसूचित करण्यात आली असल्याने सदर लोकसेवेसाठी पदनिर्देशित अधिकारी म्हणून सहायक अधिदान व लेखा अधिकारी, निवृत्तीवेतन शाखा व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून अधिदान व लेखा अधिकारी यांना घोषित केले आहे.

त्यानुसार सर्व निवृत्तीवेतनधारकांना महिन्याच्या १ तारखेस निवृत्तीवेतन प्राप्त होईल याची तजवीज करण्यात आली आहे. निवृत्तीवेतनधारकांना एस. एम. एस. द्वारे निवृत्तीवेतनातील बदलांची माहिती पुरविण्याची सुविधा सुरू करण्याकरिता संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे स्तरावरून कार्यवाही केली जात आहे. सन २०१६-१७ मध्ये जीवन प्रमाण पोर्टलचा वापर करून संगणकीकृत जीवन प्रमाणपत्र स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

**१.८ रोख व धनादेश:** ही शाखा देयके स्विकारण्याचे व देयकांचे ( धनादेश / एनईएफटी / ईसीएस /ई-कुबेरद्वारे) प्रदान करण्याचे काम करते.

**१.९ संगणक शाखा:** सर्व लेखे संगणकावर तयार करण्यात येत असून ते महालेखापाल, मुंबई यांना सादर करण्यात येतात. अधिदान व लेखा कार्यालयात देयके प्राप्त झाल्यापासून धनादेश वितरीत व लेखे तयार करण्यापर्यंत सर्व कामे संगणकावर तयार करण्यात येतात.

संगणकीकरणामुळे अधिदान व लेखा कार्यालयाची जमा व खर्चाची सविस्तर आकडेवारी रोजच्या रोज उपलब्ध होते. त्याचप्रमाणे सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतन धारकांच्या व काही इतर राज्यातील मधील निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्ती वेतनात देयकांचे संगणकीकरण करण्यात आले असून त्यांना मासिक निवृत्तीवेतनाचे प्रदान एनईएफटी / ईसीएस / ई-कुबेर मार्फत करण्यात येते. त्यामुळे निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन देय तारखेस प्रदान करण्यात येते.

तसेच सर्व देयकाचे प्रदान एनईएफटी / ईसीएस / ई-कुबेरद्वारे करण्यात येत आहे. माहे एप्रिल २०१२ पासून टीसीएस (Tata Consultancy Services) ने विकसित केलेल्या नवीन सेवार्थ प्रणालीद्वारे तयार करण्यात आलेली वेतन देयके स्वीकारण्यात येतात. संगणकीकृत लेखा तयार करण्यासाठी महालेखापाल कार्यालयातील VLC आज्ञावलीचा वापर करून संपूर्ण मासिक लेख्याचे संगणकीकरण करणे तसेच संगणकीकृत ताळमेळ घेण्यासाठी महालेखापाल कार्यालयाच्या आज्ञावलीवर सुविधा उपलब्ध करुन देणे या बाबी प्रस्तावित आहेत.

# तक्ता क्रमांक २४

# अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई

<table>
<tr><th>अ.क्र</th><th colspan="2">तपशिलवार बाबी</th><th>२०२२-२०२३</th><th>२०२३-२०२४**</th></tr>
<tr><td rowspan="2">१</td><td colspan="2">नियंत्रण अधिकाऱ्यांची संख्या</td><td>२४०</td><td>२४०</td></tr>
<tr><td colspan="2">आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची संख्या</td><td>७००</td><td>७०८</td></tr>
<tr><td>२</td><td colspan="2">राजपत्रित अधिकाऱ्यांची संख्या<br>(जे स्वत:चे वेतन देयक राजपत्रित अधिकाऱ्यांचे वेतन देयक या नमुन्यात कोषागारात सादर करतात)</td><td>६५</td><td>६७</td></tr>
<tr><td>३</td><td colspan="2">स्विकृत देयकांची संख्या</td><td>२१२१८३</td><td>१६५५८५</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">देयकांची दैनिक सरासरी</td><td>७८६</td><td>६१३</td></tr>
<tr><td rowspan="11">५</td><td colspan="4">देयकांचे प्रदान, संख्या व रक्कम (रुपये लाखात)</td></tr>
<tr><td rowspan="2">धनादेशाव्दारे</td><td>संख्या</td><td>७६१६</td><td>५९३०</td></tr>
<tr><td>रक्कम</td><td>१७८२२५७</td><td>१३००५९</td></tr>
<tr><td rowspan="2">रोखीने</td><td>संख्या</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>रक्कम</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td rowspan="2">इसीएस / एनईएफटी ने</td><td>संख्या</td><td>१०६१</td><td>११९६</td></tr>
<tr><td>रक्कम</td><td>१३३५</td><td>१५५१</td></tr>
<tr><td rowspan="2">ई-कुबेरव्दारे</td><td>संख्या</td><td>२०३५०६</td><td>१५८४५९</td></tr>
<tr><td>रक्कम</td><td>१०११२०१४</td><td>७३८२४४२</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण संख्या</td><td>२१२१८३</td><td>१६५५८५</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण रक्कम</td><td>११८९५६०५</td><td>८६८४५८३</td></tr>
<tr><td rowspan="5">६</td><td colspan="4">संकलन विभाग(रुपये लाखात)</td></tr>
<tr><td colspan="2">अ) जमा नोंदी संख्या (चलनाव्दारे)</td><td>३४५०६</td><td>२७४५८</td></tr>
<tr><td colspan="2">आ) रक्कम (लाखात)</td><td>१००७९१३</td><td>२२२४६८६</td></tr>
<tr><td colspan="2">इ)खर्च नोंदी संख्या (धनादेशाव्दारे)</td><td>४१४५</td><td>२९७०</td></tr>
<tr><td colspan="2">ई)रक्कम (लाखात)</td><td>१५९८३६०</td><td>१०७४९२९</td></tr>
<tr><td rowspan="8">७</td><td colspan="2">स्विकृत निवृत्तीवेतन आदेश संख्या</td><td>४७२५</td><td>४२८६</td></tr>
<tr><td colspan="2">स्विकृत उपदान आदेश संख्या</td><td>९८४५</td><td>९८१८</td></tr>
<tr><td colspan="2">स्विकृत उपदान आदेश रक्कम (लाखांत)</td><td>५९९२२२</td><td>९८९५४</td></tr>
<tr><td colspan="2">उपदान प्रदान संख्या</td><td>८९५०</td><td>८९२५</td></tr>
<tr><td colspan="2">उपदान प्रदान रक्कम (लाखांत)</td><td>५४४७५</td><td>८९९५८</td></tr>
<tr><td colspan="2">स्विकृत अंशदान प्रदान आदेश संख्या</td><td>६३०६</td><td>४८५६</td></tr>
<tr><td colspan="2">अंशराशीकरण प्रदान संख्या</td><td>६३०६</td><td>४८५६</td></tr>
<tr><td colspan="2">अंशराशीकरण प्रदानाची रक्कम (लाखांत)</td><td>६०८३१</td><td>४७३६७</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ठेवी-जमा ठेवी (रुपये लाखात) | | |
| | अ) चलनांची संख्या | ५५७० | ९५३४ |
| | आ) ठेवीची रक्कम (रक्कम लाखांत) | ८२०६५२ | १००१०५३ |
| ९ | ठेवींची प्रदाने (रक्कम लाखांत) | | |
| | अ) प्रमाणकांची संख्या | | |
| | मुख्य लेखाशीर्ष ८३३६ | १२५५ | १०७६ |
| | मुख्य लेखाशीर्ष ८४४३ | ४८ | ९९ |
| | आ) खातेबदल संख्या | | |
| | मुख्य लेखाशीर्ष ८३३६ | ३ | १२ |
| | मुख्य लेखाशीर्ष ८४४३ | ७ | १ |
| | इ) प्रदानाची एकूण रक्कम | | |
| | मुख्य लेखाशीर्ष ८३३६ | ४३६८८ | ३७९४४ |
| | मुख्य लेखाशीर्ष ८४४३ | १३२७१ | १७४ |

**अपेक्षित अंदाजित संख्या व रक्कमा

तक्ता क्रमांक २५

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई करीता अर्थसंकल्पीय तरतुद ( रुपये लाखांत )

| अ.क्र | कार्यक्रम | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | अर्थसंकल्प २०२३-२०२४ | सुधारित अंदाज २०२३-२०२४ | अर्थसंकल्प २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | (अ) कार्यांचे वर्गीकरण. | | | | |
| | गौणशीर्ष ०९६ अधिदान व लेखा कार्यालय (अनिवार्य) | | | | |
| | भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | दत्तमत | ४२९८.०४ | ४७७६.१७ | ४१४१.८२ | ४७९५.०७ |
| | (ब) उद्दिष्ट निहाय वर्गीकरण | | | | |
| | अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई. | | | | |
| | वेतन | ३६६१.५५ | ४४९०.३३ | ३८७७.८५ | ४४५३.९३ |
| | मजुरी | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | अतिकालिक भत्ता | ०.१६ | ०.६६ | ०.५३ | ०.४० |
| | दुरध्वनी, वीज व पाणी | ५५.७० | ३३.८० | ३३.४८ | ४०.८० |
| | कंत्राटी सेवा | ४०.०० | ४५.०० | ४०.५० | ४५.०० |
| | देशांतर्गत प्रवास खर्च | २.१५ | ४.२९ | ३.०२ | ३.६५ |
| | कार्यालयीन खर्च | ३०.६८ | ३३.७५ | ३०.४० | ४५.६० |
| | भाडेपट्टी व कर | ३०.०० | ३०.०० | ३०.०० | ५१.९६ |
| | संगणकखर्च | ४२.०५ | ३१.८९ | १९.६९ | ३१.८९ |
| | पेट्रोल, तेल व वंगण | ०.०० | १.०० | ०.९० | १.१२ |
| | लहान बांधकामे | ४३५.७५ | १०५.४५ | १०५.४५ | १२०.७२ |
| | एकूण भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण दत्तमत | ४२९८.०४ | ४७७६.१७ | ४१४१.८२ | ४७९५.०७ |
| | (क) वित्त व्यवस्थेची साधने | | | | |
| | भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | दत्तमत | ४२९८.०४ | ४७७६.१७ | ४१४१.८२ | ४७९५.०७ |

# प्रकरण क्रमांक १२
# कोषागार कार्यालयांची माहिती

जिल्हा कोषागारे ही महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक व्यवस्थापन प्रणालीचा कणा आहे. राज्य सरकारच्या वतीने महालेखापाल कार्यालयाने निश्चित केलेल्या नमून्यामध्ये जमा व खर्चाचे लेखे यांचा ताळमेळ ठेवण्याची जबाबदारी सर्व जिल्हा कोषागर कार्यालयांवर असते. तसेच, जिल्हा कोषागारातील व उपकोषागारांकडून होणाऱ्या जमा व प्रदानाच्या होणाऱ्या व्यवहाराबाबत जिल्हा कोषागार अधिकारी जबाबदार असतो. भारतीय रिझर्व बँकेशी केलेल्या विशेष करारान्वये भारतीय रिझर्व बँकेने प्राधिकृत केलेल्या राष्ट्रीय बँकांच्या शाखांमार्फत राज्य शासनाचे आर्थिक व्यवहार केले जातात.

पूर्वी सर्व जिल्हा कोषागारे हे महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखाली होती. सन १९५५ पासून सर्व जिल्हा कोषागारे वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणली गेली आहेत आणि सन १९६४ पासून उपकोषगारे ही वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली आणली गेली आहेत. सध्या राज्यात एकूण-३४ जिल्हा कोषागारे व एकूण-३२३ उपकोषागारे आहेत.

एकूण-३२३ उपकोषागारांपैकी १८ उपकोषागार कार्यालये ही उच्चश्रेणी -१, १४५ उपकोषागार कार्यालये ही उच्चश्रेणी आणि उर्वरित १६० उपकोषागार कार्यालये ही निम्नश्रेणी उपकोषागार कार्यालये अशी वर्गीकृत करण्यात आलेली आहेत. उच्चश्रेणी - १ उपकोषागारात म.वि.ले.से. (राजपत्रित गट-अ ) सहाय्यक संचालक तसेच लेखा अधिकारी, उच्चश्रेणी उपकोषागारात म.वि.ले.से. (राजपत्रित गट-ब ) सहाय्यक लेखा अधिकारी व निम्नश्रेणी उपकोषागारात विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले उपलेखापाल (वरिष्ठ लेखापाल ) उपकोषागार अधिकारी म्हणून कामकाज पाहतात.

जिल्हा कोषागारे व अधिनस्त उपकोषागारे ही जिल्हा कोषागार अधिकारी यांच्या अधिकारात असतात. राज्यातील एकूण-२८ जिल्हा कोषागारात कोषागार अधिकारी या पदावर म.वि.ले.से. संवर्गातील सहाय्यक संचालक व ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या एकूण-६ कोषागारातील कोषागार अधिकारी म.वि.ले.से. संवर्गातील उपसंचालक दर्जाचे आहेत. म.वि.ले.से. (गट-ब) संवर्गातील अधिकारी अप्पर कोषागार अधिकारी या नात्याने कोषागार अधिकारी यांना दैनंदिन कामकाजात मदत करतात.

कार्यक्षम प्रशासनाकरीता जिल्हा कोषागारामध्ये पुढील शाखा कार्यरत आहेत.

**१.आस्थापना :** शासकीय कर्मचा-यांची वेतनाचे अनुषंगाने सेवार्थ प्रणाली अमलात आणलेली आहे. सदर प्रणाली द्वारे शासकीय कर्मचा-यांचे मासिक वेतन अदा करण्यात येते.

**२.लेखापरीक्षा :** ट्रेझरी नेट प्रणाली राष्ट्रीय सूचना केंद्र, पुणे यांनी विकसीत केली आहे. त्यामध्ये राज्याच्या ३४ कोषागारे, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व ३२३ उपकोषागारांचे काम ट्रेझरी नेट प्रणाली मध्ये करण्यात येत आहे. यामध्ये आहरण व संवितरण अधिकारी यांचे कडून देयके सदर प्रणालीमध्ये स्विकारण्यात येऊन लेखापरीक्षण शाखेमार्फत महाराष्ट्र कोषागार नियम, मुंबई वित्तीय नियम तसेच शासनाचे विहित नियमानूसार तपासणी करुन प्रणाली मार्फत प्रदान करण्यात येते.

**३.ठेव :** वैयक्तिक ठेव लेखा धारकांचे धनादेश कोषागारामध्ये प्राप्त झालेनंतर त्याची नोंद ट्रेझरी नेट प्रणालीमध्ये घेण्यात येऊन सदर धनादेशाचे शासनाचे विहित नियमानूसार तपासणी केली जाते.

**४.संकलन :** ट्रेझरी नेट प्रणाली मध्ये कोषागाराकडून पारित करण्यात आलेली देयकावरुन खर्चाचा लेखा तयार करण्यात येतो तसेच राज्य शासनास मिळालेला महसूल, कर व करेत्तर रकमांचा लेखा तयार करण्यात येतो. यामध्ये कोषागार निहाय जमा व खर्चाचा लेखा तयार करुन महावार मा. महालेखापाल कार्यालयास सादर केला जातो.

**५.निवृत्ती वेतन :** राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारकांकरीता निवृत्तीवेतन वाहिनी अमलात आणलेली आहे. यामध्ये निवृत्ती वेतनाची रक्कम निवृत्ती वेतनधारकांच्या खात्यामध्ये जमा केली जाते. यामध्ये मासिक प्रदान, प्रथम प्रदान, अंशराशीकरण, कुटूंब निवृत्ती वेतन ची प्रदाने सदर प्रणालीद्वारे केली जातात.

**६.धनादेश :** कोषागारामधून पारित झालेल्या देयकांच्या रकमेचे प्रदान आहरण व संवितरण अधिकारी/कर्मचारी/निवृत्ती वेतन धारक/ त्रयस्थ अदाता यांच्या बँक खात्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पध्दतीने SBI_CMP, e-kuber या दोन पोर्टल द्वारे करण्यात येते.

**७.मुद्रांक :** कोषागारातील मुद्रांकाचे वितरण करण्यासाठी स्टँप मोडयूल प्रणाली विकसीत करण्यात आलेली आहे. चलनाची रक्कम ग्रास प्रणाली द्वारे भरणा करण्यात येऊन कोषागार स्तरावर त्याची पडताळणी करुन मुद्रांक विक्रेत्याला मुद्रांकाचे वितरण केले जाते.

**८.संगणक :** यामध्ये ट्रेझरी नेट, कोषवाहिनी, बीम्स, ग्रास, अर्थवाहिनी, सेवार्थ, निवृत्ती वेतन वाहिनी, राष्ट्रीय निवृत्ती वेतन आज्ञावली, वेतनिका, बील पोर्टल, ग्रास प्रणाली अमलात आणलेल्या आहेत.

**९.राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना :** दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना परिभाषित निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे समायोजन राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेमध्ये दि.०१.०४.२०१५ पासून करण्यात आलेले आहे. यामध्ये कर्मचा-यांचे नोंदणी अर्ज,

वजाती रकमांचे लेखांकन,रक्कम आहरीत करणे, एकत्रित अंशदाने केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडून विश्वस्त बँकेकडे पाठविणे या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

संचालक, लेखा व कोषागारे व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे यांनी आयोजित केलेल्या तपासणीद्वारे जिल्हा कोषागाराच्या कामकाजाचे नियतकालिक निरीक्षण केले जाते. ही तपासणी तपशीलवार केली जाते व त्यामध्ये शासनाने विहित केलेल्या प्रश्नावलीतील सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव असतो. तसेच, जिल्हाधिकारी हे दरवर्षी माहे मार्चमध्ये कोषागारातील सुरक्षा कक्षाची तपासणी करतात.

महालेखापाल कार्यालय (मुंबई व नागपूर) यांचेकडून राज्यातील सर्व जिल्हा कोषागारांची व उपकोषागारांची दरवर्षी तपासणी करण्यात येते. सदर तपासणीचा वार्षिक अहवाल महालेखापालांमार्फत वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात येतो.

## तक्ता क्रमांक २६
## कोषागार कार्यालयांचे कामकाज

| अ.क्र. | तपशीलवार बाबी | २०२२-२०२३ | २०२३-२०२४** |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची संख्या | | |
| | जिल्हा कोषागारे | ६७२४ | ६७९३ |
| | उप कोषागारे | ७८१४ | ८०१४ |
| | **एकूण** | **१४५३८** | **१४८०७** |
| २. | राजपत्रित अधिकाऱ्यांची संख्या ( जे स्वत:चे वेतन देयक राजपत्रित अधिकाऱ्यांच्या देयक नमुन्यात कोषागारात सादर करतात असेराजपत्रित अधिकारी) | | |
| | जिल्हा कोषागारे | १८१ | १७५ |
| | उप कोषागारे | ३८६ | ३७८ |
| | **एकूण** | **५६७** | **५५३** |
| ३. | स्वीकृत देयकांची संख्या | | |
| | जिल्हा कोषागारे | १२७६१२६ | १३४१९६४ |
| | उप कोषागारे | ६३४८६३ | ६९२७४२ |
| | निवृत्तीवेतन धारकांची तयार केलेली देयके | १५८९७७ | १७२४१० |
| | **एकूण** | **२०६९९६६** | **२२०७११६** |
| ४. | देयकांची दैनंदिन सरासरी | ७५५० | ८१८१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | देयकांचे प्रदान | | |
| | काढलेल्या धनादेशांची संख्या | ३०९१५२ | १०७७४०४ |
| | रोखीने | ११ | १२ |
| | बँकांव्दारे / इएफटी / सीएमपी व्दारे | १९३५६०७ | २०७३५०८ |
| | **एकूण** | **२२४४७७०** | **३१५०९२४** |
| ६. | संकलन विभाग | | |
| | जमा नोंदी (संख्या) | १०८११८७ | २२२०२५८ |
| | रक्कम (लाखात) | ७४५९९६३ | ८०६४१२५ |
| | खर्च नोंदी (संख्या) | २०८२०५९ | २१०७४७३ |
| | रक्कम (लाखात) | **३३८०५३३९** | **८१२२२१९१** |
| ७. | स्वीकृत निवृत्ती वेतन आदेश संख्या | | |
| | महाराष्ट्र राज्य | ४८५३७ | ५२४४७ |
| | केंद्रीय | ७ | ११ |
| | इतर राज्य | २३ | ३१ |
| | **एकूण** | **४८५६७** | **५२४८९** |
| ८. | स्वीकृत उपदान आदेश संख्या | | |
| | महाराष्ट्र राज्य | ५४६७६ | ५९६२० |
| | केंद्रीय | ० | ० |
| | इतर राज्य | ० | २५ |
| | **एकूण** | **५४६७६** | **५९६४५** |
| ९. | उपदान प्रदान आदेश संख्या | | |
| | महाराष्ट्र राज्य | ५३४७३ | ५९२४२ |
| | केंद्रीय | ० | ० |
| | इतर राज्य | ० | २५ |
| | **एकूण संख्या** | **५३४७३** | **५९२६७** |
| १०. | स्वीकृत अंशराशीकरण प्रदान आदेश संख्या | | |
| | महाराष्ट्र राज्य | ४४६११ | ४८७६६ |
| | केंद्रीय | ० | २ |
| | इतर राज्य | ३७ | ७३ |
| | **एकूण संख्या** | **४४६४८** | **४८८४१** |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | अंशराशीकरण प्रदान (संख्या) | | |
| | महाराष्ट्र राज्य | ४३३९७ | ३५४८२ |
| | केंद्रीय | ० | २ |
| | इतर राज्ये | ३७ | ७३ |
| | **एकूण संख्या** | **४३४३४** | **३५५५७** |
| १२. | ठेवी-जमाठेवी | | |
| | चलनांची संख्या | १६५१७२ | १८१४५६ |
| | खातेबदल नोंदी संख्या | १७४ | २११ |
| | ठेवींची एकूण रक्कम (लाखांत) | १५८४९८० | १७४६४०१ |
| १३. | ठेवींची प्रदाने | | |
| | माणकांची संख्या | २५८२९ | २८१३८ |
| | खातेबदल नोंदी | ११० | १४६ |
| | प्रदानाची एकूण रक्कम (लाखात) | १५२९६३५ | १९३११८४ |
| १४. | थकीत धनादेश मेळ | ० | ० |
| १५. | मुद्रांक | | |
| | अ) मुद्रांक व्यवहार संख्या | | |
| | १. न्यायीक | २१९३९६ | २४०६७४ |
| | २. न्यायीकेतर | ८८८८२२ | ९७९०८१ |
| | **एकूण** | **११०८२१८** | **१२१९७५५** |
| | आ) मुद्रांक विक्री मुल्य (लाखांत) | | |
| | १. न्यायीक | १८२८२ | १८७६६ |
| | २. न्यायीकेतर | ९९९६५ | १०९३५७ |
| | **एकूण** | **११८२४७** | **१२८१२३** |

** अंदाजित सरासरी संख्या व अंदाजित रक्कम लाखांत

## तक्ता क्रमांक २७

### कोषागार कार्यालयांकरीता अर्थसंकल्पीय तरतुद

( रुपये लाखांत )

| अ.क्र | कार्यक्रम | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | अर्थसंकल्प २०२३-२०२४ | सुधारित अंदाज २०२३-२०२४ | अर्थसंकल्प २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | (अ) कार्यांचे वर्गीकरण. | | | | |
| | **गौणशीर्ष ०९७ कोषागार आस्थापना (अनिवार्य)** | | | | |
| | भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | दत्तमत | २४२३४.७३ | २५२५२.२९ | २६१४८.२१ | २८१००.३५ |
| | (ब) उद्दिष्ट निहाय वर्गीकरण | | | | |
| | कोषागार आस्थापना | | | | |
| | वेतन | १८३३८.२२ | २०७४९.६१ | २०३७७.६५ | २३०३२.०७ |
| | मजुरी | ११.३९ | १२.६५ | ११.३९ | १३.२८ |
| | अतिकालिक भत्ता | ०.६३ | १.४० | १.१२ | १.०० |
| | दुरध्वनी, वीज व पाणी | १९८.०१ | २९८.०० | २६८.२० | २९१.५० |
| | कंत्राटी सेवा | १०५.१२ | ३२०.८१ | २५६.६५ | ४२०.८१ |
| | देशांतर्गत प्रवास खर्च | ८३.७६ | १४८.४४ | १०३.९१ | १५५.८७ |
| | कार्यालयीन खर्च | १४५९.७६ | ९९१.२६ | ९००.१४ | १०१२.२९ |
| | भाडेपट्टी व कर | ८०.७९ | ८३.४८ | १३६.०९ | १४६.०९ |
| | संगणक खर्च | ३९५७.०५ | २६४५.६३ | ४०९२.१५ | ३०२४.४३ |
| | पेट्रोल, तेल व वंगण | ०.०० | १.०१ | ०.९१ | ३.०१ |
| | व्यावसायिक सेवा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण दत्तमत | २४२३४.७३ | २५२५२.२९ | २६१४८.२१ | २८१००.३५ |
| | (क) वित्त व्यवस्थेची साधने | | | | |
| | भारित | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | दत्तमत | २४२३४.७३ | २५२५२.२९ | २६१४८.२१ | २८१००.३५ |